

बुद्ध पौर्णिमेच्या
हार्दिक शुभेच्छा !


अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड


आयपीएल सामना क्र.४४




गुजरात टायटन्स विरुद्ध
राजस्थान रॉयल्स

वेळ : रात्री.७.३० वा. स्थळ : जयपूर


www.surajyadigital.com | शुक्रवार, दि. ५ मे २०२३ | ▶ वर्ष : २१ वे ▶ अंक : २१५ वा किंमत : ५ रुपये ▶ पाने ८


# मध्यरात्रीची सफर 'काळ'रात्र ठरली, सोलापूरच्या तीन मित्रांना भोवली

## ▪ टेंभुर्णीजवळ भीषण अपघात, भवानी पेठ परिसरात शोककळा

✔ सुराज्य/टेंभूर्णी

**सोलापूरहून पुण्याकडे दुचाकीवर जात असताना एका अज्ञात वाहनाने ठोकरल्यामुळे सोलापुरातील तिघे मित्र ठार झाले. एखादा माणूस संकटातून वाचला तर वेळ आली होती पण काळ आला नव्हता, असे म्हटले जाते परंतु या तिघा मित्रांसाठी काळ आणि वेळ जुळून आली होती. त्यातून त्या तिघांचाही घात झाला. तिघांपैकी दोघेजण पुण्याला चालले होते. यासाठी त्यातील दोघांनी खासगी बसचे तिकीटही काढले होते. परंतु तो बेत रद्द करुन सर्वांनी दुचाकीवर जाण्याचा घाट घातला. अखेर हा प्रवास त्यांच्या जिवावर बेतला. हे तिघेही मित्र सोलापुरातील भवानी पेठमध्ये राहणारे होते. यामुळे भवानी पेठेवर गुरुवारी शोककळा पसरली.**

या अपघातात तेजस सुरेश इंडी (वय २०, रा. मिलन अपार्टमेंट, भवानी पेठ), लिंगराज शिवानंद हाळके (वय २४, रा. भवानी पेठ) हे दोघे जागीच ठार झाले, तर तिसरा मित्र गणेश शरणप्पा शेरी याचा सोलापुरातील शासकीय रुग्णालयात उपचार घेत असताना मृत्यू झाला. तेजस इंडी हा पुण्यातील एका महाविद्यालयात शिक्षण घेत होता. तेजस इंडे व गणेश शेरी हे दोघे खासगी बसने रात्री साडेदहा वाजता जाणार होते, मात्र लिंगराज हाळके याने दुचाकीवरून जाण्याचा हट्ट धरला. हाच निर्णय चुकला आणि मध्यरात्री तिघांच्या जिवावर बेतला. ही दुःखद वार्ता समजताच भवानी पेठ परिसरात शोककळा पसरली.

महामार्ग पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार तेजस इंडी, लिंगराज हाळके आणि गणेश शेरी हे तिघे एकाच मोटार सायकल (एम. एच. १३/ डी. झेड. ९८२६) वरून ट्रिपल सीट सोलापूरहून पुण्याला निघाले होते. गुरुवारी मध्यरात्री २.३० च्या दरम्यान सोलापूर-पुणे महामार्गावर टेंभुर्णीजवळ अरण गावच्या हद्दीत वरवडे नाका येथे त्यांच्या दुचाकीला अनोळखी वाहनाची धडक बसली. या अपघातात तेजस इंडी आणि लिंगराज हाळके या दोघांचा जागीच मृत्यू झाला तर तिसरा मित्र गणेश शेरी हा गंभीर जखमी झाला होता.



तेजस इंडी



लिंगराज हळके



गणेश शेरी

अपघातानंतर प्रथमत: पेट्रोलिंग करणाऱ्या महामार्ग पोलिसांनी अपघातातील वाहन बाजूला करून तिघांना तातडीने टेंभुर्णी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल केले. तेजस इंडी आणि लिंगराज हाळके या दोघांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले. तिसरा मित्र गणेश शेरी यास जखमी अवस्थेत सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले परंतु उपचारादरम्यान त्याचाही मृत्यू झाला. या अपघात प्रकरणी किरण सुभाष इंडी यांनी टेंभुर्णी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून अनोळखी वाहन चालकाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. अधिक तपास पोलीस निरीक्षक जोग हे करत आहेत.



### तिघेही तरुण आई-वडिलांना एकुलते एक होते

**अपघात मृत पावलेल्यांपैकी तेजस इंडे हा पुणे येथील डी. वाय. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयात मेकॅनिकल शाखेच्या तिसऱ्या वर्षात शिकत होता. तर गणेश शेरी हा पुणे येथील एका मॉलमध्ये कामास होता. तर लिंगराज हाळके हा सोलापुरातील हिरा एजन्सीज येथे सेल्स मॅनेजर म्हणून काम करीत होता. हे तिघेही अविवाहित होते. यातील गणेश शेरी याच्यावर अक्कलकोट तालुक्यातील धोत्री येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. तर तेजस इंडे व गणेश हाळके यांच्यावर भवानी पेठेतील लिंगायत स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. हे तिघेही आई-वडिलांना एकुलते एक होते.**

### गणेश आईसह पुणे येथे गुजरण करीत होता

**अपघातात मृत पावलेला गणेश शेरी याचे वडील नसल्याने आईसह ते काम करुन पुणे येथे गुजराण करीत होते. एका शुभकार्याच्या निमित्ताने ते मंगळवारी सोलापुरात आले होते. कार्यक्रम झाल्यानंतर गणेशची आई बुधवारी दुपारी पुण्याला गेली. तेजस यांने तिला 'मी संध्याकाळी किंवा गुरुवारी येतो असे, सांगितले होते. पण वाटेतच त्याच्यावर काळाने झडप घातली.**

## वडिलाच्या घरातून ७ लाखांचे दागिने पळविले

**मुलीसह दोघांविरुद्ध गुन्हा**

✔ **सोलापूर** : पिलीव (ता.माळशिरस) येथे राहणाऱ्या एका शेतकऱ्याच्या घरातून रोख रकमेसह ७ लाख ७० हजाराचे दागिने पळविले. ही चोरी मंगळवारी दुपारच्या सुमारास घडली. या प्रकरणात माळशिरसच्या पोलिसांनी शेतकऱ्याच्या मुलीसह दोघांविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल केला आहे.

यासंदर्भात विठ्ठल महादेव बोराडे (वय५० रा. पिलीव) यांनी माळशिरस पोलिसात दाखल फिर्याद दाखल केली. त्याप्रमाणे पोलिसांनी त्यांची मुलगी काजल विठ्ठल बोराडे आणि शेजारी राहणारे विकास सदाशिव जमादार या दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला. बुधवारी दुपारच्या सुमारास या दोघांनी त्यांच्या घरातील गादी खाली ठेवलेली कपाटाची चावी घेतली. आणि कपाट उघडून त्यातील १ लाख रुपये रोख आणि २११ ग्राम सोन्याचे दागिने असा ऐवज चोरीन नेल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

## विजेच्या शॉकद्वारे चुलत भावाचा खून; आरोपीला ३ दिवसांची कोठडी

✔ **सोलापूर** : शेत जमिनीच्या वादातून चुलत भावाचा विद्युत शॉकद्वारे खून केल्याप्रकरणी अटकेत असलेल्या येथील राहुल संजय ढेरे ( वय२५ रा. गलंदवाडी ता.मोहोळ) याला तीन दिवस पोलीस कोठडीत ठेवण्याचा आदेश न्यायदंडाधिकारी स. वा.ठोंबरे यांनी दिला आहे.

फिर्यादी दिनकर बिरा ढेरे हे त्याच्या परिवारासह बोपले (ता. मोहोळ ) येथे राहण्यास आहे. आरोपी राहुल ढेरे हा फिर्यादीचा पुतण्या असून त्यांच्यात २०१९ सालापासून जमिनीच्या वाटणीबाबत वाद चालू होता. त्यामुळे बऱ्याच वेळा आरोपी व त्याचे वडिलांनी फिर्यादी व त्याचे मुलास जीवे मारण्याची धमकी दिली होती. फिर्यादी दिनकर बिरा ढेरे व आरोपी राहुल संजय ढेरे यांची शेत जमीन बोपले हद्दीत एकमेकांच्या लगतच होती. आरोपीने १२ जून२०२१ रोजी उघड्या असलेल्या विद्युत मीटर पेटीतून पाठीमागे कनेक्शन घेतला होता . नवनाथ ढेरे हा सकाळी मोटर चालू करण्यात गेला त्यावेळी सदर लोखंडी पेटीस हात लागतात. तो शॉक बसून



जागीच मयत झाला होता. त्यानंतर पोलिसांनी सदरचे प्रकरणाची अपघाती मृत्यू अशी नोंद करून प्रकरण निकाली काढले होते.त्यानंतर न्याय मिळण्याकरिता फिर्यादी दिनकर ढेरे यांनी वरिष्ठ पोलिसांकडे अर्ज दाखल केला परंतु पोलिसांनी काहीच दाद न दिल्यामुळे फिर्यादीने ॲड. प्रशांत नवगिरे यांच्यामार्फत मोहोळ येथील न्यायालयात खाजगी फिर्याद दाखल केली. फिर्यादीचे वकिलांचा युक्तिवाद विचारात घेऊन तत्कालीन न्यायदंडाधिकारी यांनी आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल करण्याचा आदेश मोहोळ पोलिसांना दिला होता. त्याप्रमाणे मोहोळ पोलिसांनी आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल करून अटक केली.आणि पोलीस कोठडी घेतली. यात फिर्यादीतर्फे ॲड. प्रशांत नवगिरे, ॲड. श्रीपाद देशक, ॲड.सिद्धाराम पाटील तर सरकार तर्फे ॲड.नितीन भादुले यांनी काम पाहिले.

## बलात्कारातील आरोपीचा चाकूने भोसकून खुनाचा प्रयत्न

✔ **सोलापूर** : बलात्काराच्या खटल्यातून जामीनवर सुटलेल्या आरोपीचा चाकूने भोसकून खुनाचा प्रयत्न करण्यात आला. ही घटना गोंडरे ( ता.करमाळा) येथे बुधवारी घडली.

समाधान रोहिदास नीळ (वय २७ रा. निमगाव ता.करमाळा) असे जखमीचे नाव असून त्याला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. या प्रकरणात करमाळा पोलिसांनी आरोपीला अटक करून ५ दिवसाची पोलीस कोठडी घेतली आहे. जखमी समाधान नीळ याच्या विरुद्ध करमाळा पोलिसात गेल्या वर्षी बलात्काराचा गुन्हा दाखल झाला होता.त्या गुन्ह्यात पोलिसांनी त्याला अटक केली होती. काही दिवसापूर्वी तो जामीनवर सुटला होता. काल दुपारी समाधान नीळ हा गोंडरे येथे गेला होता.त्यावेळी दुचाकी वरून आलेल्या पीडित महिलेचा पतीने तुला जिवंत सोडत नाही. असे म्हणत त्याला चाकूने भोसकूले.अशी नोंद करमाळा पोलिसात झाली. तपास पोलीस निरीक्षक गुंजवटे करीत आहेत.

## विजापूर रोडवरील राजस्व नगरात दोन मुलांसह विवाहितेची आत्महत्या

✔ **सोलापूर** : दोन लहान मुलांचा मुलांची हत्या करून मातेने गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना विजापूर रोड परिसरातील राजस्व नगरात गुरुवारी सायंकाळच्या सुमारास उघडकीस आली. ज्योती सुहास चव्हाण (वय २७) तिची दोन मुले अथर्व चव्हाण (वय साडेतीन वर्षे) आणि मुलगी आर्या चव्हाण (वय २) वर्षे अशी मयतांची नावे आहेत.

आज सायंकाळच्या सुमारास हा प्रकार उघडकीस आला. घरातील छताला ज्योती चव्हाण हिचा मृतदेह ओढणीच्या सहाय्याने गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळला. तर अथर्व आणि आर्या यांचे मृतदेह घरात



आढळले. त्यांचा गळा दाबून हत्या करून मातेने आत्महत्या केली असावी असा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. मयत ज्योती हिचे पती सुहास चव्हाण हे एसटी महामंडळात नोकरीस असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले.

## पवार विठ्ठल कारखान्यावर येणार

### बायो सीएनजी प्रकल्पाचे उद्घाटन

✔ सुराज्य/पंढरपूर

श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्यावर बायो सीएनजी प्रकल्पाच्या उद्घाटनासाठी राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार येणार असल्याची माहिती कारखान्याचे अध्यक्ष अभिजित पाटील यांनी दिली आहे.

अभिजित पाटील यांनी आज शरद पवार यांची मुंबई येथे बैठक घेऊन बायो सीएनजी प्रकल्पाच्या उद्घाटनासाठी त्यांना निमंत्रण दिले आहे. शरद पवारांनी त्यांचे निमंत्रण स्वीकारत ७ मे रोजी कार्यक्रमासाठी हजेरी लावणार आहेत.

श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याच्या पायाभरणीपासून शरद पवार यांचे कारखान्याशी अतूट नाते आहे. वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटच्या सहकार्याने विठ्ठल सहकारी साखर कारखान्यावर बायो सीएनजी प्रकल्प उभा राहणार आहे. उद्घाटनासाठी शरद पवार येणार आहेत. तसेच कारखाना स्थळावर शेतकरी मेळाव्याचे देखील आयोजन करण्यात आले आहे. भालके यांची सत्ता गेल्यानंतर पहिल्यांदाच शरद पवार विठ्ठल सहकारी साखर कारखान्यावर येणार आहेत. साखर कारखानदारीत मोठा जम बसवणारे अभिजित पाटील यांच्या राजकीय कारकिर्दीसाठी हा महत्त्वाचा कार्यक्रम असणार आहे. या कार्यक्रमात





येणाऱ्या विधानसभा निवडणुकीवर शरद पवार काय बोलणार याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

### पंढरपूर तालुक्यात भाकरी फिरवणार

**नुकताच शरद पवार यांनी राष्ट्रीय पदाचा राजीनामा देण्याचा निर्णय जाहीर करत भाकरी फिरवली. तसेच आता पंढरपूर तालुक्यातील राजकीय समीकरणे बदलले आहेत. अभिजीत पाटील यांच्या रूपाने तालुक्याला नवीन नेतृत्व मिळाला आहे. भालके - काळे यांच्या व्यतिरिक्त विधानसभेला चेहरा हा राष्ट्रवादीला मिळू शकतो त्या अनुषंगाने पंढरपूर तालुक्यातील भाकरी फिरणार असल्याचे बोलले जात आहे.**

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



कुणी डॉक्टर देता का डॉक्टर !!


कल्याण
557-79-469

मेन बाजार
159-56-600


## सर्वंकष सर्वेक्षणात खरीच माहिती द्या, अन्यथा मिळकती अनधिकृत ठरवणार; आयुक्तांचा इशारा



✔ सुराज्य/सोलापूर

सोलापूर महापालिका प्रशासनाच्या वतीने मिळकत, नळ कनेक्शन यासह विविध घटकांचा सर्वंकष असे सर्व्हेक्षण करण्यात येणार आहे. त्यासाठी नियोजनबद्ध कृती आराखडा तयार करण्यात आला आहे. एकूण २६३ कर्मचाऱ्यांमार्फत हे सर्वंकष सर्वेक्षण करण्यात येत आहे.

घरोघरी जाऊन हे सर्वेक्षण केले जाणार आहे. ८ भरारी पथकांसह नियंत्रण अधिकाऱ्यांचीही या कामावर नजर राहणार आहे. सर्वंकष सर्वेक्षणात खरीच माहिती द्या अन्यथा मिळकती अनधिकृत ठरवणार असल्याचा इशारा महापालिका आयुक्त शीतल तेली उगले यांनी दिला आहे. महापालिकेच्या वतीने सोलापूर शहरातील सर्व मिळकती, नळ कनेक्शन, ड्रेनेज कनेक्शन, प्रॉपर्टी कार्ड, बांधकाम परवाना, वापर परवाना, कर आकारणी यासह इतर सर्व माहिती या सर्वेक्षण अंतर्गत संकलित करण्यात येत आहे.



घरोघरी जाऊन या सर्व्हेक्षणातील पथके माहिती संकलित करत आहेत. या माध्यमातून महापालिकेकडे सोलापूर शहरातील मिळकती संदर्भात संपूर्ण माहिती उपलब्ध होणार आहे.या संदर्भात आयुक्तांनी नियोजनबद्ध असा कृती आराखडा तयार केला आहे. याबाबत गुरुवारी पहिले प्रशिक्षण पार पडले. त्यानंतर येत्या ९ मे रोजी पुन्हा दुसरे प्रात्यक्षिक व प्रशिक्षण देण्यात येणार आहे त्यानंतर आठवडाभरातच हा सर्वंकष सर्वे सुरू करण्यात येणार आहे. या सर्व्हेक्षणासाठी घरोघरी आलेले पथक सर्व माहिती गोळा करून गुगल फॉर्म मध्ये भरणार आहेत. यासाठी सर्वांनी महापालिकेच्या पथकास सहकार्य करावे, असे आवाहन महापालिका आयुक्त शीतल तेली-उगले यांनी केले आहे.

**गुगल फॉर्ममध्ये माहिती भरणार :** या महत्त्वपूर्ण अशा सर्वेक्षणासाठी एकूण ११३ पथके तयार करण्यात आली आहेत. हे पथक घरोघरी जाऊन सर्व माहिती संकलित करणार आहेत. त्यानंतर सर्व डाटा एकत्रित करण्यात येईल. ही माहिती गुगल फॉर्म मध्ये भरण्यात येणार आहे. साधारणता : एक पथक रोज ४० घरांचा सर्व्हे करणार आहेत. एकूण ११३ पथके हे काम पाहणार आहेत. साधारणतः तीन महिन्यात हे सर्वेक्षणाचे काम पूर्ण करण्यात येईल, असेही महापालिका आयुक्त शितल तेली-उगले यांनी सांगितले.

**भरारी पथक व नियंत्रण अधिकारी ठेवणार नजर :** मिळकत कर विभागाकडील १५० कर्मचारी आणि सामान्य प्रशासन विभागाकडून ११३ असे एकूण २६३ कर्मचारी हे सर्वेक्षणाचे काम करणार आहेत. तसेच त्यावर भरारी पथक नेमण्यात येत असून आठ विभागातील आठ झोन अधिकारी हे एका अवेक्षकसह पाहणी करणार आहेत. अतिरिक्त आयुक्त -२ , उपायुक्त - २, सहाय्यक आयुक्त २ हे नियंत्रण अधिकारी म्हणून काम पाहणार आहेत. हे नियंत्रण अधिकारी महापालिका आयुक्तांना दैनंदिन माहिती देणार आहेत.

**महापालिकेच्या इतिहासात प्रथमच असा सर्व्हे :** महापालिका प्रशासनाकडून यापूर्वी वर वरचा मिळकती नळ कनेक्शन शोधण्याचा सर्व्हे करण्यात आला होता. परंतु महापालिकेच्या इतिहासात प्रथमच महापालिका आयुक्त शितल तेली - उगले यांच्या मार्गदर्शनाखाली असा सर्वांकष सर्व्हे करण्यात येणार आहे. यामधून महापालिकेला महत्त्वपूर्ण अशी माहिती उपलब्ध होणार आहे. सोलापूर शहर विकासासाठी त्याचा चांगला फायदा होईल. तसेच शहरातील लोकसंख्येचे अंदाजही येईल, असे आयुक्तांनी स्पष्ट केले.

# संकटांवर संकट...

जगात सत्ताधीश म्हणून मिरवणाऱ्या अमेरिकेवर एक ना अनेक संकटांची मालिका सुरू असल्याचे दिसत आहे.गन अर्थात बंदूक संस्कृती तिथे बोकाळत चालली आहे. दररोज सार्वजनिक ठिकाणी बंदुका चालवल्या जात आहेत. आर्थिक मंदीचे दुसरे एक संकट येऊ पहात आहे. नैसर्गिक आपत्ती हे संकट वेगळेच. अमेरिकेतील बुडणाऱ्या मोठ्या बँकांमध्ये आणखी एका बँकेची भर पडली. ही बँक आहे फर्स्ट रिपब्लिक बँक. या बँकेसमोरील संकट मार्च महिन्याच्या अखेरीस सुरू झाले. अचानक बँकेचे श्रीमंत ग्राहक ठेवी काढून घेऊ लागले अन् बँक अडचणीत सापडली. बँक बुडताच नियामकांनी पुढाकार घेऊन ती ताब्यात घेतली. आता ही बँक जेपीमॉर्गन अँड चेसने विकत घेतली. बँकेतून पहिल्या तिमाहीत तब्बल १०० अब्ज डॉलरच्या ठेवी काढून घेण्यात आल्या. अमेरिकेत सिलिकॉन व्हॅली बँक आणि सिग्नेचर बँक या दोन बँकानंतर तिसरी मोठी बँक बुडाली असून, केवळ दोन महिन्यांत हे घडले आहे. ही बँक बुडल्यामुळे अमेरिकेतील संकट वाढणार काय? असा प्रश्न जगासमोर उभा आहे. ओहायोतील जेम्स हर्बर्टने १९८५ मध्ये ही बँक स्थापन केली. मोठी कर्जे कमी व्याजदराने देण्यास बँकेने सुरुवात केली. नंतर २००७मध्ये ही बँक मेरिल लिंचने ताब्यात घेतली. मेरिल लिंचच्या मालकी नंतर बँक ऑफ अमेरिकेकडे गेली. त्यामुळे फर्स्ट रिपब्लिक बँकेचीही २०१० मध्ये विक्री झाली. त्यानंतर ही बँक भांडवली




बाजारात सूचिबद्ध झाली. या बँकेची व्यावसायिक पद्धती गुंतवणूकदारांना आकर्षित करणारी होती. अतिश्रीमंतांना तारण अथवा कर्जासाठी कमी व्याजदर बँकेकडून आकारले जात होते. बँकेच्या ग्राहक वर्गात इन्स्टाकार्टचे संस्थापक अपूर्व मेहता, गुंतवणूकदार चमथ पालिहापिटिया आणि विकासक स्टीफन एम. रॉस यांचा समावेश होता. बँकेने स्वत:च या नावांचा उल्लेख केला होता. याचबरोबर शाळा आणि विनानफा तत्त्वावर चालणाऱ्या संस्थांना बँकेने एकूण व्यावसायिक कर्जांपैकी २२ टक्के कर्ज दिले होते. आर्थिक संकटांची मालिका कोठून सुरू झाली,याचा शोध लावला जात आहे पण काही कारणे समोर आली आहेत. फर्स्ट रिपब्लिक बँकेने जानेवारी महिन्यात दिलेल्या माहितीनुसार, भागधारकांना बँकेने वार्षिक १९.५ टक्के परतावा दिला. हा परतावा प्रतिस्पर्धी बँकांपेक्षा दुप्पट होता. परंतु, बँकेतील विमासंरक्षण असलेल्या ठेवींची संख्या इतर बँकांपेक्षा कमी होती. अमेरिकेत एका बचत खात्यातील अडीच लाख डॉलरच्या ठेवींवर सरकारी विमा संरक्षण असते. फर्स्ट रिपब्लिक बँकेतील विमा संरक्षण नसलेल्या ठेवींचे प्रमाण खूप मोठे होते. यातच अमेरिकेची मध्यवर्ती बँक फेडरल रिझर्व्हने व्याज दरात वाढ सुरू केली. यामुळे बँकेची कर्जे आणि गुंतवणुकीचे मूल्य आपोआप कमी झाले. तेथूनच बँकेच्या संकटाची सुरुवात झाली. फेडकडून मागील वर्षी महागाई आटोक्यात आणण्यासाठी व्याजदरात वाढ सुरू होताच बँकेने तोटा दाखवण्यास सुरुवात केली. बँकेचे गुंतवणूकदार पैसे काढून दुसरीकडे गुंतवू लागले. यामुळे बँकेला मागील वर्षी डिसेंबरअखेर ४.८ अब्ज डॉलरचा एकूण तोटा झाला. त्यात मुदत पूर्ण झालेली गुंतवणूक आणि सरकारी रोख्यांमध्ये झालेल्या तोट्याचा प्रामुख्याने समावेश होता. त्याआधीच्या वर्षात बँकेला केवळ ५.३ कोटी डॉलरचा तोटा झाला होता. बँकेचा तोटा वाढत जाऊन यंदा मार्चअखेर तो ९.४ ते १३.५ अब्ज डॉलरदरम्यान पोहोचला. हा गुंतवणूकदार आणि विश्लेषकांनी मांडलेला अंदाज होता. फेडच्या व्याजदर वाढीच्या चक्रानंतर सुरू झालेली घसरण बँकेला रोखता आली नसल्याचे यातून समोर आले. अमेरिकेतील नियामकांच्या पुढाकाराने जेपीमॉर्गन अँड चेसने फर्स्ट रिपब्लिक बँकेचा ताबा घेतला आहे. अमेरिकेतील आठ राज्यांत असलेल्या बँकेची ८४ कार्यालये आता जेपीमॉर्गन चेस बँकेची शाखा म्हणून पुन्हा उघडली जातील. त्यामुळे फर्स्ट रिपब्लिक बँकेच्या ग्राहकांना जेपीमॉर्गनची सेवा मिळेल. याचबरोबर आधीच मोठी असलेली जेपीमॉर्गन ही बँक आणखी मोठी झाली आहे. या व्यवहारांतर्गत जेपीमॉर्गन चेसकडून अमेरिकेतील फेडरल डिपॉझिट इन्शुरन्स कॉर्पोरेशनला १०.६ अब्ज डॉलर दिले जाणार आहेत. याचबरोबर फर्स्ट रिपब्लिकचा तोटा विभागून घेण्याबाबत जेपीमॉर्गन आणि फेडरल डिपॉझिट इन्शुरन्स कॉर्पोरेशन यांच्यात करार झाला आहे. जेपीमॉर्गनने फर्स्ट रिपब्लिकची एककुटुंब, गृह आणि व्यावसायिक कर्जे विकत घेतली असली तरी कंपनी कर्जे विकत घेतलेली नाहीत. अमेरिकेत दोन महिन्यांत तीन बँका बुडाल्या आहेत. या निमित्ताने तिन्ही बँकांच्या व्यवसाय पद्धतीमध्ये असलेले साम्य समोर आले आहे. या बँकांच्या बुडण्यामुळे अमेरिकेतील अनेक मध्यम आकाराच्या बँकांवर दबाव येत आहेत. त्यांचे ठेवीदार पैसे काढून घेत आहेत आणि या बँकांना फेडकडून कर्जाऊ पैसे घ्यावे लागत आहेत. बँकिंग संकट अजूनही बिकट होत असल्याचे चित्र आहे.

शैक्षणिक

# नवीन शैक्षणिक धोरण संभ्रम आणि आव्हाने

पहिल्या पाच वर्षात पूर्व प्राथमिक शिक्षणाची तीन म्हणजे अंगणवाडी, इयत्ता पहिली व दुसरी यांचा समावेश आहे. खेळ, कृती, शोध यावरच्या शिक्षणास या स्तरावर महत्त्व दिले आहे. २. तिसरी ते पाचवी टप्प्यावरती भाषिक व अंकीय साक्षरता, समजपूर्वक वाचन, लेखन यावर भर देण्यात आला आहे. तसेच स्थानिक भाषा, खेळ यावर आधारित आनंददायी अभ्यासक्रमाची रचना या स्तरावर करण्यात येत आहे. ३. सहावी ते आठवी या स्तरावर कृतींवर आधारित प्रायोगिक अभ्यासक्रम म्हणजे व्यावसायिक हस्तकला व कौशल्य विकास करण्याच्या दृष्टीने शिक्षण देण्यात येणार आहे. ४. नववी ते बारावी या चार वर्षात वेगवेगळ्या ४० विषयांचा अभ्यास करण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळणार आहे. कला, वाणिज्य व विज्ञान असे शाखाभेद न ठेवता आवडीचे विषय निवडता येतील.

अलीकडच्या काळात भारताची संस्कृती, परंपरा, देशाविषयीचा अभिमान या गोष्टी लोकस्मरणातून कमी होत आहेत त्यामुळे त्याला पुन्हा उजाळा देण्यासाठी मातृभाषा, भारतीय भाषा, बहुभाषिकत्व, देशप्रेम यांना महत्त्व दिले आहे. आजपर्यंत दुर्लक्षित राहिलेला पूर्वप्राथमिक शिक्षणाला अधिकृत दर्जा मिळणार आहे. सरकारी आणि खाजगी शिक्षण समान असणार आहे. शिक्षण हक्क कायदा तीन ते अठरा वर्षापर्यंत म्हणजे बारावीपर्यंतचे शिक्षण हे सक्तीचे व मोफत असणार आहे. या धोरणात आंतरविद्याशाखीय अभ्यास केला जाणार आहे म्हणजे मराठीचा गणिताची, गणिताचा विज्ञानाशी आणि विज्ञानाचा फॅशन डिझायनिंगशी काय संबंध आहे. दहावी बारावी परीक्षा रद्द होणार नाहीत बोर्ड ही अस्तित्वात राहतील. फक्त परीक्षा वर्षातून दोन वेळा होणार. घोकंपट्टी व कोचिंग क्लास संस्कृती यांची गरज संपवण्यासाठी प्रयत्न. पाचवीपर्यंत मातृभाषेतूनच शिक्षण मिळणार. तिसरी पासूनच शिक्षणाबरोबर व्यावसायिक कौशल्य शिकवले जाणार. एका शैक्षणिक बॅक ऑफ क्रेडिटची स्थापना केली जाणार आहे. कला, क्रीडा, संगीत, योग या विषयांना अभ्यासक्रमातच सहभागी. या धोरणात त्रिभाषा सूत्राचा समावेश असेल पण भाषा निवडीचे स्वातंत्र्य विद्यार्थ्यांना. सर्वांना शिक्षणाची समान संधी. शाळाबाह्य, दिव्यांग व विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांचा सहभाग. बहुआयामी मूल्यमापनाचा स्वीकार केला जाणार.

**ज्येष्ठ वैज्ञानिक डॉ. के. कस्तुरीनंदन यांच्या अध्यक्षतेखाली ९ सदस्यांनी नवीन शैक्षणिक धोरण तयार केले आहे. तब्बल ३४ वर्षानंतरचे आणि भारतीय शिक्षण क्षेत्रामध्ये आवश्यक असे आमूलाग्र परिवर्तन करण्यासाठी जागतिक दर्जाचे शिक्षण देण्यासाठी व विद्यार्थ्यांना अर्थार्जनासाठी सक्षम करतानाच त्यांचे आयुष्य सर्वार्थांनी समृद्ध व्हावे या दृष्टिकोनातून धोरणाची रचना करण्यात आली आहे. या धोरणात गुणवत्तापूर्वक, परवडणारे, समानता शिकवणारे शिक्षण, प्रवेश प्रक्रिया आणि जबाबदारी निश्चिती म्हणजे उत्तरदायित्व या पाच मुख्य स्तंभावर आधारित हे धोरण आहे. या धोरणात पूर्णतः भारतकेंद्री शिक्षण आहे म्हणजे भारताचा समृद्ध ज्ञानवारसा आणि लोकसंस्कृती यांची संविधानिक मूल्ये आणि जागतिक पातळीवरील विकास यांच्याशी सांगड घालून ज्ञानाच्या क्षेत्रातील एक नेतृत्व म्हणून भारत तयार व्हावा या दृष्टीने विकसित केलेली स्वदेशी शिक्षण व्यवस्था. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये जागतिक शिक्षण विकास कृती कार्यक्रम समाविष्ट असून सर्वांसाठी समावेशक आणि समान गुणवत्तेचे शिक्षण व सर्वांसाठी निरंतर अध्ययनाच्या शिक्षणाच्या संधींना प्रोत्साहन देण्याचे २०३० पर्यंत उद्दिष्ट आहे. पूर्वीची १०+२ शैक्षणिक संरचना ऐवजी नवीन अध्यापनशास्त्रीय संरचना ५+३+३+४ अशी व्यवस्था असणार आहे. बोर्ड परीक्षेत फक्त पाठांतराला महत्त्व न देता दैनंदिन आयुष्यात उपयोगाला येणाऱ्या ज्ञानाचा वापर केला जावा हे धोरणात अधोरेखित केले आहे. शिक्षणामध्ये बदल हा अपेक्षित आहेच. सध्या डिजिटल क्रांतीचे युग आलेले आहे. या नवक्रांतीला सामोरे जाण्यासाठी आपल्या शिक्षण पद्धतीत बदल केला तरच जागतिक पातळीवर आपण टिकून राहू.**

आतापर्यंत या शैक्षणिक धोरणासंबंधी ज्या बातम्या येत आहेत त्या पाहून महाराष्ट्रातला पालक वर्ग, शिक्षक, विद्यार्थी यांचा गोंधळ उडालेला आहे. सर्वच संभ्रमावस्थेत आहेत. सर्वच महत्त्वाचे जसा राष्ट्रीय शैक्षणिक आराखडा प्रकाशित झाला तसा राज्य सरकारने राज्याचा आराखडा प्रकाशित करणे अभिप्रेत असते. परंतु आपल्या राज्यात राज्याचा आराखडा प्रकाशित न झाल्याने अनेक अफवा किंवा ज्याला जो विचार सुचला आहे. तो त्याने मांडल्यामुळे पूर्ण गोंधळ उडाला आहे. या धोरणाविषयी कुणालाच पूर्ण माहिती नाही. या धोरणात लोकसहभागातून पैसे उभे करायचे असा विचार आहे. ज्या संस्था आर्थिकदृष्ट्या कमकुवत आहेत त्यांचे काय? त्यामुळे हे धोरण लोकांना माहिती करून देणे गरजेचे आहे. अनेक संस्थांच्या माध्यमातून या धरणाची माहिती समाजाला करून द्यावी. तसेच लोकप्रतिनिधींनी धोरण उचलून धरले तर यशस्वी होईल पण हे लोकप्रतिनिधींनी वेगळ्याच कामात गुंतलेले आहेत आणि सर्वात महत्त्वाचे हे धोरण मुख्याध्यापक, शिक्षक, संस्थाचालक यांच्यापर्यंत व्यवस्थितपणे पोहोचलेले नाही. ही वस्तुस्थिती आहे.



**धोरणाची विशेषत:** - शिक्षण लवचीक बनवणे, दर्जेदार शिक्षण विकसित करणे, मुलांना भारतीय संस्कृतीशी जोडणे, प्रत्येक मुलाची क्षमता ओळखणे आणि विकसित करणे, मुलांमध्ये साक्षरता आणि संख्या शास्त्राचे ज्ञान विकसित करणे, मुलांना सुशासन शिकवणे आणि सक्षम करणे, मूल्यमापनावर भर देणे, मुलांना विविध भाषा शिकवणे, मुलांचे विचार सर्जनशील आणि तार्किक बनविणे, उत्कृष्ट संशोधन करणे, तंत्रज्ञानाचा जास्तीत जास्त वापर करण्यावर भर देणे अशी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची विशेषता सांगता येईल.

आव्हाने - असे नवीन शैक्षणिक धोरण असले तरी प्रत्यक्ष त्याची अंमलबजावणी आव्हानात्मक असणार आहे. कारण सर्व ठिकाणची परिस्थिती, शालेय सुविधा, राज्याची मानसिकता, नोकरशाहीचे उत्तरदायित्व, खर्चाचा प्रश्न, लोकांचा सहभाग सारखाच असेल असे नाही. एकाच वेळी इतक्या मोठ्या व्यवस्थेला गतिमान करणे अवघड आहे. शिक्षण हे अनुभवात्मक, अनुप्रयोग, संशोधन आधारित अंतरवासिका देखील असणार आहे. मात्र, उच्च शिक्षण ७०% खाजगी व्यवस्थापनाच्या हाती आहे. खाजगी क्षेत्राचे योगदान हे या धोरणातील कळीचा मुद्दा ठरणार आहे. अनेक ठिकाणी पायाभूत सुविधाच नाहीत. विद्यार्थ्यांना विषय निवडीची मुभा असणार आहे पण त्या विषयाचे शिक्षक संबंधित शाळेत उपलब्ध असणे गरजेचे आहे. राज्याचा आराखडाच अद्याप जाहीर न झाल्यामुळे त्याची अंमलबजावणी २०२४ पासून कशी होणार?

**- प्रा. तात्यासाहेब काटकर, अकलूज.**

टुडेज् ब्लॉग

# सहकारी उद्योगांची उत्तुंग झेप

देशात सहकार चळवळीची मुहूर्तमेढ महाराष्ट्र राज्यात रोवली गेली. राज्याच्या विकासात आणि ग्रामीण विकासात सहकार चळवळींचा वाटा अतिशय महत्त्वाचा राहिला. राज्यात सहकारी कारखान्यांची मुहूर्तमेढ रोवली गेली आणि सहकारी उद्योगांनी पाहता पाहता उत्तुंग झेप घेतली. आता ही समृद्ध परंपरा आणि उद्योगस्नेही संस्कृती पुढे नेणे गरजेचे आहे.

राज्याची निर्मिती झाल्यापासून सर्व यंत्रणा कार्यान्वित होतात आणि विविध क्षेत्रांचा विकास घडवून आणत ते राज्य आकार घेऊ लागते. हा विकास घडवून आणताना संबंधित भागाची भौगोलिक स्थिती, तेथील शक्तिस्थळे, संरचना, उपलब्ध श्रमशक्ती, पारंपरिक व्यवसाय आणि कौशल्ये, त्यांची मानसिकता आणि तेथील संस्कृती आदी विषयांचा अभ्यास करून ती विकसित होण्यासाठी प्रयत्न केले जातात. या पार्श्वभूमीवर बघायचे झाल्यास महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर अन्य क्षेत्रांबरोबरच इथल्या कृषीविश्वाचा कसा आणि किती विकास झाला हे तपासून पाहायची संधी घ्यावी लागेल. महाराष्ट्र दिनानिमित्त समारंभ साजरे होत असताना हा ऊहापोह बऱ्याच मुद्द्यांवर प्रकाश टाकू शकतो.

महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर सुरुवातीच्या काळात राज्याचा विविध क्षेत्रातील प्रगतीचा, विकासाचा वेग बऱ्यापैकी राहिला. त्याचे अपेक्षित परिणामही दिसून आले. पण नंतर मात्र राज्याच्या विकासाचा वेग काहीसा मंदावल्याचे दिसत आहे. तसे पाहिले तर महाराष्ट्राने देशाला दिलेल्या काही संकल्पनांचे, योजनांचे योगदान मोलाचे राहिले आहे. यात स्थानिक स्वराज्य संस्थांची संकल्पना तसेच रोजगार हमी योजना यांचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. महाराष्ट्रात रोजगार हमी योजना आदर्शवत ठरलीच; परंतु देशपातळीवर अंमलबजावणीतूनही तिची उपयुक्तता दिसून आली. महाराष्ट्रात भीषण दुष्काळी स्थितीत ग्रामीण भागातील शेतकरी, शेतमजुरांना तसेच सामान्य जनतेला या योजनेने मोलाचा आधार दिला. या योजनेअंतर्गत झालेली कामेही महत्त्वाची ठरली. यातून केंद्र सरकारने विशेष दखल घेऊन ही योजना देशपातळीवर राबवण्याचा निर्णय घेतला. त्याचबरोबर राज्याच्या विकासात, विशेषत: ग्रामीण विकासात सहकार चळवळींचा वाटा अतिशय महत्त्वाचा राहिला. राज्यात सहकारी कारखान्यांची मुहूर्तमेढ रोवली गेली आणि सहकारी उद्योगांनी पाहता पाहता उत्तुंग झेप घेतली. सर्वत्र सहकारी संस्थांचे जाळ निर्माण झाले. विविध कार्यकारी सोसायट्या, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, सहकारी पतसंस्था ग्रामीण अर्थकारणाचा कणा ठरल्या; परंतु ज्या महाराष्ट्रात सहकार चळवळीचा पाया उभारण्यात आला, तिथेच या चळवळीला भ्रष्टाचार, गैरव्यवहारांचे ग्रहण लागले. परिणामी, सहकार संस्था अडचणीत आल्या. दरम्यानच्या काळात राजकारण्यांनी सहकारी चळवळीचा ताबा घेतला. आपला प्रभाव वाढवण्यासाठी सहकार चळवळींचा वापर करण्यावर भर दिला गेला. या साऱ्या बाबींमुळे सहकारी चळवळीचा मूळ हेतूच बाजूला पडला. मोजक्याच सहकारी संस्थांचा कारभार आदर्शवत राहिला आहे. ही या संदर्भातील त्यातल्या त्यात समाधानाची बाब म्हणावी लागेल.



आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे महाराष्ट्राला सुरुवातीच्या काळात यशवंतराव चव्हाण यांच्यासारखे दूरदृष्टीचे आणि उत्तुंग नेतृत्व मिळाल्यामुळे शेतकरी, कामगार आणि सर्वच स्तरात समाधानाचे वातावरण निर्माण झाले होते; परंतु नंतरच्या काळात नेतृत्वाबाबत आणि विकासाबाबतही राज्याला तेवढी झेप घेता आली नाही, असे म्हणावे लागेल. असे असले तरी ठरावीक गतीने का होईना, राज्याची प्रगती होत राहिली. या काळातील राज्याच्या वाटचालीत तत्कालीन मुख्यमंत्री वसंतराव नाईक, वसंतदादा पाटील आणि शरद पवार यांचा मोलाचा वाटा राहिला.

**- मुकुंद गायकवाड, कृषितज्ज्ञ.**

जन्म हा अखेरचा

## कायानुग्रहस्थल - ३



घड्याळात चार वाजले आणि पत्नीने त्याला हलवून जागे केले. उठल्याबरोबर तो भयभीत नजरेने इकडे-तिकडे पाहू लागला आणि 'पोलीस पोलीस' असे बरळू लागला. हा असे का करतो हेच पत्नीला कळेना. तिने त्याला नीट जागे करुन 'काय झाले' हे विचारले. तो भानावर आला. त्याला कळले की आपण जे पाहिले ते स्वप्न होते. आसपास पोलीस वगैरे कोणी नाही. स्वप्नात जे घडले ते सारे पत्नीला सविस्तर कथन करुन तो म्हणाला, 'बरे झाले, तू मला झोपेतून जागे केलेस. मला उठवायला तू उशीर केला असतास तर मला तुरुंगाची हवा खावी लागली असती. तू फार चांगले केलेस. अगदी वेळेवर उठवलेस.'

आपली जागृतावस्था हेदेखील दीर्घकालीन स्वप्न मानले जाते. स्वप्नातील दु:खापासून सुटका करुन घेण्यासाठी जागे होणे आवश्यक आहे. स्वत:ला जाग येत नसेल तर दुसऱ्या कोणीतरी जागे करायला हवे. जागे झाले की, स्वप्न आणि दु:ख विरुन जाते. त्याप्रमाणे संसाराच्या दीर्घ स्वप्नातून जाग आल्यावर संसारदु:ख नाहीसे होते आणि सर्वत्र शिवच शिव दिसू लागतो. सकाळी सकाळी दोघांची भेट झाली की एक दुसऱ्याला विचारतो, 'काय जागे झालाय काय?' दुसरा म्हणतो, 'होय, झालो.' पण खरे तर कोणीच जागे झालेले नसते. बिछान्यावर उठून बसणे म्हणजे काही खरे जागे होणे नव्हे. असे तर आपण असंख्य वेळा जागे झालो आहोत. त्याला काही अर्थ नाही. प्रपंचात परमात्मदर्शन घेणे हेखरे जागेपण होय. वेदांनी 'उत्तिष्ठत् जाग्रत्' उठा जागेव्हा - असे या अर्थाने म्हटले आहे. हे खरे जगणे आहे. याप्रकारे जो जागा होतो तो पुन्हा निद्रावश होत नाही. आपण तर कितीवेळा झोपेतून जागे होतो आणि किती वेळा झोपतो याला मर्यादा नाही. जागा झालेल्या मनुष्याच्या दृष्टीसमोरुन जसे स्वप्न नाहीसे होते, त्याप्रमाणे शिवज्ञानसंपन्न शिवयोग्यासमोरुन हे विश्व अदृश्य होते. मग हे विश्व नष्ट होते की काय? तर तसे नाही. विश्व आहे तसेच असते. परंतु शिवयोग्याला ते परमात्मरुपात दिसत असते. आपल्या जवळ येणाऱ्या जीवाकडे तो 'शिव' म्हणून पाहत असतो. त्याचे हृदय विशाल असते. त्याची दृष्टी व्यापक असते. असा शिवयोगीच आपल्या शरीराने सर्वांवर अनुग्रह करत असतो. **अज्ञानमेव सर्वेषां संसारभ्रमकारणम् । तन्निवृत्तौ कथं भूय: संसारभ्रमदर्शनम् ।।१७.१२।।**

**(क्रमश:) - काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

## प्रवासी भाड्यात दिलेल्या सवलती रद्द का?

भारतीय रेल्वेने ज्येष्ठ नागरिकांसाठी तिकीट दरात दिली गेलेली सवलत कोरोना काळात बंद केली ती पुन्हा लागू केली नाही. माहिती अधिकारात मिळालेल्या माहितीनुसार रेल्वेने १ एप्रिल २०२२ ते ३१ मार्च २०२३ या कालावधीत सुमारे ४.६ कोटी पुरुष, ३.३ कोटी महिला आणि १८००० ट्रांसजेंडर यांचा समावेश असलेल्या सुमारे ८ कोटी ज्येष्ठ नागरिक प्रवाशांकडून तिकिटांच्या माध्यमातून सुमारे ५०६२ कोटी रुपयांचा महसूल मिळविला. यामध्ये तिकीट दरांतील सवलत रद्द केल्यामुळे मिळालेल्या २२४२ कोटी रुपयांचा महसूल समाविष्ट आहे. एका हाताने प्रवाशांना खूष करण्यासाठी प्रवास भाड्यात सवलती द्यायच्या आणि दुसऱ्या हाताने त्या रद्द करीत आपला महसूल वाढवायचा! याला काय म्हणावे? जनसेवेसाठी कटिबद्ध असणाऱ्या सरकारला जनता, प्रवासी यांना दिलेल्या सवलती रद्द करून नेमके काय साध्य करायचे असते?

**- राजन पांजरी, जोगेश्वरी.**

जनमानस

## जीएसटी रेकॉर्डब्रेक वसुली अर्थव्यवस्था सुधारल्याचे एक चिन्ह

एप्रिल २०१३ मध्ये जीएसटीचे विक्रमी उत्पन्न झाले. जीएसटी २०१७ साली सुरु करण्यात आली. त्यामुळे करविषयक बाबतीत सुसूत्रता आली. अनेक कर नष्ट होऊन एक करप्रणाली अस्तित्वात आली या कार्यप्रणालीचे एकूण चार टप्पे आहेत. ते असे ५ टक्के, १२ टक्के, १८ टक्के व २८ टक्के सोने सारख्या धातूवर ३ टक्के आहे. काही दिवसापूर्वी कोरोना साथीत या जीएसटीचे उत्पन्न कमी होते. त्यानंतर मात्र अर्थव्यवस्थेने जोर पकडला व हा विक्रमी पल्ला गाठला गेला. एप्रिल २०२३ मध्ये तब्बल १.८७ लाख कोटी रुपयांची वसुली साली या वसुलीत महाराष्ट्र प्रथम क्रमांकावर असून कर्नाटक दुसऱ्या व गुजरात तिसऱ्या स्थानावर आहे. एकूणच कर संकलन वाढले आहे व ही अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने चांगली बातमी आहे. आज जगात सर्वत्र महागाईचा उद्रेक झाला आहे. इतकेच काय जगाची महासत्ता असलेल्या अमेरिकेचे सुद्धा कर्ज वाढत आहे. तेथेही महागाई प्रचंड प्रमाणात वाढली आहे. शेजारील पाकिस्तान, श्रीलंका तसेच बंगलादेश हे दिवाळखोरीत जाण्याच्या मार्गावर आहेत. अशा वेळी भारताने आपली आर्थिक स्थिती वेगाने पुढे नेली आहे. ही घटना कौतुकास्पद आहे यात शंका नाही. काही दिवसात जगात भारत तिसऱ्या क्रमांकावर अर्थव्यस्थेत जाईल, असे भाकीत काही दिवसांपूर्वी केले होते. त्याच्या वाटचालीच्या दृष्टीने भारताची प्रगती चालू आहे. **- शांताराम वाघ, पुणे.**

# भवतु सब्ब मंगलम्

आज सर्वत्र भगवान बुद्ध जयंती साजरी होत आहे. सद्यपरिस्थितीमध्ये मानव आणि निसर्ग सुखरूप कसे राहतील?, हाच सर्वात महत्त्वाचा प्रश्न आहे. गौतम बुद्धांच्या मते, मानवाने निसर्गातील झाडे-झुडपे तसेच तमाम जीवजंतू बरोबरच नदी-तलावांतील पाणी स्वच्छ ठेवून या सर्वांचे रक्षण केले तरच मानव स्वतःही सुरक्षित आणि स्वस्थ राहील. 'भवतु सब्ब मंगलम्' या त्यांच्या वचनाप्रमाणे माणूसच नव्हे तर सर्व प्राणिमात्र, जीवसृष्टीचेच कल्याण व्हावे यासाठी त्यांची धडपड चालली होती. आपल्या शिष्यांच्या मदतीने त्यांनी आपल्या लोककल्याणकारी संदेशांचा आणि वचनांचा प्रसार आणि प्रचार केला. त्यांचे संदेश आणि वचने उदान' नावाने ओळखली जातात. माणसाने जागृत म्हणजेच डोळस किंवा प्रज्ञावान व्हावे, बुद्धिवंत म्हणजेच बुद्ध व्हावे, परावलंबी न राहता स्वावलंबी बनावे, प्रकाश पुंज म्हणजेच दीपक व्हावे, 'अत: दीप भव:' असे ते सांगतात. कारण मनुष्य जन्म दुर्लभ असून तो पुनः मिळण्याची शाश्वती नसल्याने माणसाने तात्काळ जागे व्हावे असे म्हणतात.

गौतम बुद्ध सांगतात की 'प्रदूषण हे दोन स्तरावर समजून घेऊन ते रोखले पाहिजे. एक म्हणजे मनुष्याने वैयक्तिक पातळीवर आणि दुसरे सामुदायिक पातळीवर. एक व्यक्ती सुधारली आणि आपल्या आजूबाजूच्या झाडे तथा वनस्पतिविषयी आणि जीवजंतूविषयी संवेदनशील झाली आणि सहृदयतेने व्यवहार करू लागली तर संपूर्ण समाजामध्येही आपोआप बदल होईल असे त्यांचे ठाम मत होते. याकरिता त्यांनी समाजासाठी पंचशील सिद्धांत (तत्त्वे) दिला आहे, ज्याचे अनुसरण आणि अनुवर्तन केले पाहिजे. पंचशील तत्त्वे अशी आहेत- प्राणिमात्रांची हत्या करू नये, चोरी, चाडीचपाटी, लावालावी करू नये, विवाहापूर्वी कामवासने पासून दूर राहणे तर विवाहानंतर पती-पत्नीशी एकनिष्ठ राहणे, खोटे बोलणे किंवा खोटा व्यवहार न करणे, दारू,जुगार किंवा वाईट व्यसनांच्या आहारी न जाणे किंवा अशा ठिकाणी न जाणे. निरोगी मानव समाज निर्मितीसाठी हा उपदेश एखाद्या सूत्राप्रमाणे आहे.'



बुद्धांनी सांगितले की, 'जगामध्ये पशू-पक्षी, झाडे-वनस्पती, जीवजंतूंच्या अनेक जाती असतात. ज्या आपल्याला लांबूनही ओळखता येतात. मात्र माणसाला पाहून त्याची जात ओळखता येत नाही आणि म्हणूनच जगांत माणसाची मनुष्य जात ही एकच जात आहे. यात वेगळेपण किंवा भिन्नता नाही. दुसरे, कोणतीही व्यक्ती जन्माच्या आधारे उच्च, नीच असत नाही तर ती तिच्या कर्माने उच्च किंवा नीच ठरत असते. झाडाझुडूपामध्ये, बागेमध्ये, जंगलात, नदीकिनारी, गाव-शहरांपासून दूर भिक्षू निवास आणि विहार बांधण्यामध्ये बुद्धांचा भौगोलिक, नैसर्गिक आणि सामाजिक पर्यावरणा बरोबरच पर्यावरण आणि परिस्थितीच्या शुद्धतेचा आग्रह लक्षात येतो. विहार रचनेमध्ये कोणत्याही बाजूने हवा आली तर पूर्ण इमारतीमध्ये हवा आणि प्रकाश येऊ शकेल, विहाराच्या मध्यभागी अंगण, कडेला विहीर, सांडपाण्यासाठी गटार आदींवर विशेष लक्ष दिले जात असे. बाहेरून विहारामध्ये प्रवेश करणाऱ्यांसाठी हात-पाय धुण्यासाठी पाण्याची वेगळी व्यवस्था तसेच विहारात एका बाजूला छोटासा जलाशय असे. विनयपिटक (बौद्ध ग्रंथ) नुसार गवतावर, पाण्यामध्ये किंवा उभे राहून मलमूत्र विसर्जनास मनाई होती. बुद्धांनी पाण्याच्या योग्य वापरावर जोर दिला. ते पाण्याचा दुरुपयोग निषिद्ध मानत असत. रोहिणी नदीच्या पाणी वाटपा वरून शाक्य आणि त्याच्या शेजारील राज्य कोलियों मधील युद्ध हेही त्यांच्या गृह त्यागा चे एक कारण होते.एकदा कूटदंत नावाच्या व्यक्तीने बुद्धांना यज्ञा बाबत त्यांचे मत विचारले असता ज्या यज्ञात निष्पाप प्राण्यांची आहुती दिली जाते, तो यज्ञ निरुपयोगी असल्याचे त्यांनी सांगितले होते. सुत्तनिपात (बौद्ध ग्रंथ) नुसार गाईच्या रक्षणावर भर देणारे बुद्ध हे पहिले व्यक्ती होते. वनस्पतींची वाढ होण्यासाठी आणि मनुष्याला भोजन आणि ताकद देण्यासाठी गाय मदत करत असल्याचे सांगितले होते. त्यांच्या उपदेशाने लोकांनी पशुहत्या बंद केली आणि त्यामुळे पशुसंवर्धन झाले आणि त्याचा लाभ शेतीला झाला. गौतम बुद्धांनी आपल्या शिकवणीद्वारे लोकांना वृक्षारोपणाचे महत्त्व पटून दिले आणि आपल्या अनुयायांना निसर्गाशी ताळमेळ ठेवून जीवन जगण्याची प्रेरणा दिली. त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांना विनम्र अभिवादन !

**- विजय कोष्टी, कवठे महांकाळ.**

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

# हेल्मेट व सीट बेल्ट सक्तीचे उल्लंघन करणाऱ्यावर कारवाई करावी : ॲड.खंडार

## जिल्हा रस्ता सुरक्षा आढावा बैठकीच्या अध्यक्ष स्थानावरून सूचना

✔ सुराज्य/सोलापूर

दुचाकी वाहनांच्या वाढत्या अपघात संख्येचा विचार करता, हेल्मेटसक्ती तसेच चारचाकी वाहनांचे अपघात कमी करण्यासाठी सीट बेल्ट सक्तीची कडक अंमलबजावणी करावी. याचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकांवर सक्त कायदेशीर कारवाई करावी, असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाच्या रस्ते सुरक्षा समितीचे सचिव तथा कायदेशीर सल्लागार ॲड. हर्षीत खंडार यांनी आज येथे दिले. जिल्हास्तरीय रस्ता सुरक्षा आढावा बैठकीच्या अध्यक्ष स्थानावरून ते बोलत होते.



नियोजन भवन सभागृहात झालेल्या या बैठकीस जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर, पोलीस अधीक्षक (ग्रामीण) शिरीष सरदेशपांडे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक हिंमत जाधव, पोलीस उपायुक्त अजित बोऱ्हाडे, परिविक्षाधीन आयपीएस नौमी साटम, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी अर्चना गायकवाड, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता दत्तात्रय गावडे आणि संतोष कुलकर्णी, राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण पंढरपूरचे प्रकल्प संचालक आय. व्ही. नारायणकर, सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी अमरसिंह गवारे, महामार्ग सुरक्षा पथकाचे रंजन सावंत आदि उपस्थित होते. ॲड. हर्षीत खंडार म्हणाले, दुचाकी वाहनांचे अपघात व त्यामध्ये मृत्युमुखी पडणाऱ्यांचे प्रमाण अधिक आहे. यामध्ये हेल्मेट न वापरणाऱ्यांचे प्रमाण अधिक आहे. ते कमी करण्यासाठी प्रयत्न करावेत. हेल्मेट व सीट बेल्ट सक्तीचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकांवर सक्त कायदेशीर कारवाई करावी.

अधिकाधिक नागरिकांचा रस्ते सुरक्षा अभियानात सहभाग घ्यावा, असे ते म्हणाले. प्रारंभी जिल्ह्यातील सर्व महामार्ग, महत्त्वाची देवस्थाने, शहर व ग्रामीण भागातील जास्त अपघात होणारी ठिकाणे, मागील तीन वर्षात झालेल्या अपघातांची संख्या इत्यादी बाबींची माहिती देवून त्यावर करण्यात येणाऱ्या उपाययोजना व विविध उपक्रमांचे सादरीकरण मोटर वाहन निरीक्षक सागर पाटील यांनी केले. यावेळी विजय गायकवाड, वाय. बी. वेळापुरे, एम. ओ. मदान, ए. जी. सायकर तसेच वाहतूक शाखेचे अधिकारी, मोटर वाहन निरीक्षक, सहायक मोटर वाहन निरीक्षक उपस्थित होते.



## आनंद चंदनशिवेंकडून आयुक्त, अतिरिक्त आयुक्तांचा सत्कार

✔ **सोलापूर** : विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३२ व्या जयंती उत्सवा मध्ये सोलापूर महापालिकेच्यावतीने उत्तम सहकार्य लाभल्याबद्दल माजी नगरसेवक आनंद चंदनशिवे यांनी आयुक्त शितल तेली उगले तसेच अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे यांचा सत्कार केला. सोलापूर शहरातील सर्व वस्त्यांमध्ये पालिकेच्यावतीने स्वच्छता, मिरवणूक मार्गावरील संपूर्ण व्यवस्था, महिलांसाठी मोफत बस सेवा, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था आदी सोयी,सुविधा पुरवण्यात आल्या. या यानिमित्त सोलापूर शहरातील भीमसैनिकांच्या वतीने सोलापूर महानगरपालिकेच्या मा. आयुक्त शितल तेली -उगले व मा.अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे यांचा सत्कार सोलापूर महानगरपालिका कार्यालय येथे करण्यात आला. यावेळी माजी नगरसेवक गणेश पुजारी, श्रीमंत जाधव, अविनाश भडकुंबे, हृदयनाथ मोकाशी, प्रबुद्ध भारत तरुण मंडळाचे अध्यक्ष अमित बनसोडे, भीमा मस्के, धीरज वाघमोडे, प्रदीप गवळी आदी उपस्थित होते.





## पीसीपीएनडीटी जिल्हा सल्लागार समितीची बैठक

✔ **सोलापूर** : गर्भधारणा व प्रसूतिपूर्व निदान व तंत्रज्ञान जिल्हा सल्लागार समितीची बैठक जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. धनंजय पाटील यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या बैठकीस श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालयाचे बालरोग विभाग प्रमुख डॉ. सचिन बंदीछोडे, डॉ. विजय शेटे, इंडियन मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. मिलिंद शहा, जिल्हा सरकारी अभियोक्ता ॲड. क्यातम, स्त्री रोग प्रमुख व प्रसुती शास्त्र संघटनेचे अध्यक्ष डॉ. विवेक विरकर आदि उपस्थित होते. या सभेमध्ये जिल्ह्यामध्ये स्त्रीभृणहत्या रोखण्यासाठी व मुलींचा जन्मदर वाढण्यासाठी, गर्भलिंग निदान होवू नये, यासाठी प्रभावी उपाययोजना करण्याबाबत चर्चा करण्यात आली. गर्भधारणा व प्रसवपूर्व निदान तंत्र कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत सर्व समिती सदस्यांनी सूचना दिल्या. एकूण ७ नवीन सोनोग्राफी सेंटर्सना मान्यता देण्यात आली. तसेच नुतनीकरणासाठी २ सेंटरना मान्यता देण्यात आली.

## पोखरापुरात अज्ञात कारणावरून ९ वीत शिकणाऱ्या मुलीने केली आत्महत्या

✔ **मोहोळ** : पोखरापूर (ता मोहोळ ) येथील इयत्ता ९ वीत शिकणाऱ्या १५ वर्षीय शाळकरी मुलीने बाथरूम मध्ये अज्ञात कारणावरून साडीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना ३ मे रोजी सायंकाळी ६.३० वाजण्याच्या सुमारास उघडकीस आली. याप्रकरणी मोहोळ पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली. तालुक्यातील पोखरापूर येथे जयप्रकाश ब्रह्मदेव बाबर हे आपल्या कुटुंबासमवेत राहत असून त्यांची श्रावणी जयप्रकाश बाबर (वय १५)ही मुलगी मोहोळ येथे एका शिक्षण संस्थेत इयत्ता ९ मध्ये शिक्षण घेत होती. दि ३ एप्रिल रोजी सायंकाळी ६.३० वाजण्याच्या सुमारास श्रावणीची आजी ही गावातील शेजारी असलेल्या महिलां बरोबर बोलत बसली होती. त्यानंतर त्यांना बाथरूमला जायचे होते म्हणून त्यांनी बाथरूमचा दरवाजा ढकलला असतात तो उघडला नाही. आतून कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. त्यानंतर आत मध्ये श्रावणी हिने लोखंडी पाईपला साडीच्या साह्याने गळफास घेतल्याचे दिसले. श्रावणी हिला येथील शासकीय रुग्णालयात शवविच्छेदन करण्याकरिता आणण्यात आले. ही खबर श्रावणीचे चुलते विनायक महादेव बाबर यांनी मोहोळ पोलीस ठाण्यात दिली. पोलिसांनी अज्ञात कारणावरून गळफास घेऊन आत्महत्या केल्या प्रकरणी आकस्मात मृत्यूची नोंद केली असून अधिक तपास मोहोळ पोलीस करत आहेत.



## धामणगाव येथे विष पिऊन आत्महत्या

✔ **सोलापूर** : धामणगाव (ता.बार्शी) येथे राहणाऱ्या सचिन शिवाजी थिटे (वय ३९) याने विष पिऊन आत्महत्या केली . २ मे रोजी दुपारच्या सुमारास त्याने शेतात अज्ञात कारणावरून विष प्राशन केले होते. त्याला सोलापुरातील शासकिय रुग्णालयात दाखल केले असता तो गुरुवारी सकाळी मरण पावला. अशी प्राथमिक नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

## कल्याणनगर येथे लोखंडी पाईपने मारहाण

✔ **सोलापूर** : आसरा चौक परिसरातील कल्याणनगर येथे घरात घुसून लोखंडी पाईपने केलेल्या मारहाणीत बसवराज चंद्राम पुजारी (वय ४३) हे जखमी झाले. ही घटना बुधवारी रात्रीच्या सुमारास घडली. त्यांना उपचारासाठी शासकिय रुग्णालयात दाखल करण्यात आले. तू मुलाला कामावर का पाठवले नाही? असे म्हणत अमोल अवताडे आणि इतर चौघांनी त्यांना मारहाण केली. अशी नोंद विजापूर टाका पोलिसात झाली आहे.

### कुर्डुवाडी नगरपरिषद कुर्डुवाडी
### पाणीपुरवठा विभाग
### निविदा सूचना क्र.८ सन २०२२-२३

**Main portal : http://mahatenders.gov.in**

कुर्डुवाडी नगरपरिषद, सन २०२२-२३ या वर्षामध्ये सातवी फेर ई-निविदा मागवित आहे. ई-निविदा व कोऱ्या निविदा संच वरील संकेतस्थळावर दि.०४/०५/२०२३ ते दि.११/०५/२०२३ पर्यंत उपलब्ध आहेत. नमूद कामाचे निविदा प्रक्रियेचे वेळापत्रक http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

(शिक्का)

सही/-
मुख्याधिकारी
कुर्डुवाडी नगरपरिषद

### ▶ दिल्लीत घुमला जय महाराष्ट्राचा नाद

## सोलापूरच्या लाठी संघाचा दणदणीत विजय

✔ **सोलापूर** : २८ मे ते २ मे दरम्यान दिल्ली येथील ताल कटोरा स्टेडियम येथे राष्ट्रीय इंदोर मार्शल आर्ट गेम्स फेडरेशन, दिल्ली असोसिएशन अँड दिल्ली ऑलिम्पिक असोसिएशन यांच्यावतीने लाठीकाठीच्या राष्ट्रीय स्पर्धा सिरीज वन घेण्यात आल्या. यामध्ये महाराष्ट्राचे प्रतिनिधीत्व करत सोलापूरच्या लाठी असोसिएशनच्या बारा विद्यार्थ्यांची निवड झाली होती.

या स्पर्धेमध्ये सोलापूरच्या विद्यार्थ्यांनी १० सुवर्णपदक, ६ रौप्य पदक, ६ कांस्यपदक पटकवत तिसऱ्या क्रमांकाचा लाठी चॅम्पियनशिप चषक पटकाविला आणि एक मे च्या दिवशी सोलापूर (महाराष्ट्र) वासियांना एक आगळी वेगळी भेट देत (दिल्ली ही तर आमचीच) हे सिद्ध केले आहे. यावेळी सोलापूर रेल्वे स्थानकावर ती जिल्ह्यातील सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांचे व प्रशिक्षकांचे जंगी स्वागत पालकवर्गाकडून करण्यात आले.




या १२ विद्यार्थ्यांना शिवराम भोसले मुख्य प्रशिक्षक व उपाध्यक्ष लाठी इंडिया ऑर्गनायझेशन व प्रशिक्षक आश्विन कडलासकर जिल्हा सचिव तथा एशियन निर्णायक लाठी यांचे प्रशिक्षण लाभले.

या स्पर्धा विविध लाठीच्या इव्हेंटस् व सबज्युनिअर ते सिनीअर एज कॅटेगिरीमध्ये घेण्यात आल्या. या विद्यार्थ्यांनी लाठी-काठीच्या जय सिद्धेश्वर शिवाचार्य जी व सोलापूर शहर जिल्हा लाठी असोसिएशनचे उपाध्यक्ष व सिनेट सदस्य संजय साळुंखे तसेच लाठी इंडियाचे महागुरु सुभाष मोहिते लाठी इंडिया ऑर्गनायझेशनचे उपाध्यक्ष अजय शहा, महिला प्रशिक्षिका व राष्ट्रीय निर्णायक अंजना कडलास्कर यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या.

**यशस्वी विद्यार्थ्यांचे पदसंख्या व लाठी इव्हेंट वयोगट खालीलप्रमाणे,**

१२ वर्षाच्या आतील मुले - १) आदित्यराज माने - १ सुवर्णपदक, १ रौप्य पदक, लाठी काठ पवित्रा, २) हर्षद भोसले १ रौप्य पदक दुवे लाठी, ३) अरमान पटेल - १ रौप्य पदक एकमलाठी, १ कांस्यपदक दुवे लाठी.
१४ वर्षाच्या आतील मुली - १) गार्गी चव्हाण - १ सुवर्णपदक एकमलाठी, १ रौप्य पदक दुवे लाठी, २) धनश्री धावारे - १ रौप्य पदक एकमलाठी, १ कांस्यपदक लाठी काठ पवित्रा.
१६ वर्षाआतील मुली - १) शर्वरी ढाले - १ सुवर्ण पदक, १ रौप्य पदक लाठी काठ पवित्रा २) पायल धावारे - १ रौप्य पदक लाठी काठ पवित्रा.
१६ वर्षाआतील मुले - १) प्रतोष आळंद - १ सुवर्ण पदक पंचम लाठी आखणी १ रौप्य पदक लाठी काठ पवित्रा २) छत्रवीर पवार - १ सुवर्णपदक पंचम आखणी, १ सुवर्णपदक दुवे लाठी युद्ध कला ३) यशराज धावारे - १ सुवर्णपदक पंचम आखणी १ सुवर्णपदक दुवे लाठी युद्ध कला, ४) प्रेम गायकवाड - १ सुवर्ण पदक पंचम आखणी १ कांस्यपदक लाठी काठ पवित्रा ५) श्लोक कोळी - १ सुवर्ण पदक पंचम आखणी , १ कांस्य पदक लाठी काठ पवित्रा.

## राणे यांचे सोलापुरात स्वागत

✔ सुराज्य/सोलापूर

केंद्रीय मंत्री नारायणराव राणे यांचे सोलापुरात भाजप आणि सेनेच्या नेत्यांकडून स्वागत करण्यात आले. मंगळवेढ्यात होणाऱ्या कृषि उद्योग मेळाव्याला जाण्यासाठी केंद्रीय मंत्री राणे सोलापुरात सकाळी आले होते.




रेल्वे स्टेशनवर त्यांचे स्वागत भाजपाचे शहराध्यक्ष विक्रम देशमुख, शिवसेना जिल्हा प्रमुख अमोल शिंदे, जिल्हाप्रमुख मनीष काळजे यांनी केले. यावेळी शहरप्रमुख मनोज शेजवाल, आनंद भवंर, जगदीश बाबर, सुनील बापू खटके, सागर शिंदे, सुहास माने, प्रकाश घोडके, अविनाश काळे आदी उपस्थित होते. मंगळवेढ्यातील कार्यक्रम झाल्यानंतर राणे यांनी विमानाने मुंबईला प्रयाण केले. यावेळी भाजपाचे शहराध्यक्ष विक्रम देशमुख यांनी त्यांची भेट घेतली. सोलापुरात काही नवीन योजना आणता येतील का याबाबत देशमुख यांनी त्यांच्याशी चर्चा केली.












## पानगल प्रशालेच्या शिक्षिका कमर शेख सेवानिवृत्त

✔ **सोलापूर** : एम. ए. पानगल अँग्लो उर्दू हाईस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाच्या ज्येष्ठ शिक्षिका सौ. कमरुन्निसा जैकी अनवर शेख या ३३ वर्ष सेवेनंतर सेवानिवृत्त झाल्या. सौ. कमर शेख या इंग्रजी विषयाच्या शिक्षिका म्हणून कार्यरत होत्या. पानगल प्रशालेचा मरहूम नईम शेख मेमोरियल सभागृहामध्ये सौ. कमर शेख यांचा सेवानिवृत्त कार्यक्रम झाला. सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. हारून रशीद बागबान होते. सदर कार्यक्रमात प्रमुख पाहुणे बी.क्यू. के. प्रशालेच्या प्राचार्या सबीना इंग्लगी, सुरय्या जहागीरदार (उपमुख्याध्यापिक), बीबीनाज हरकारे, निकहत नल्लामन्दू, जाकिर शाहापुरे, वसीम नल्लामन्दू हे होते. या कार्यक्रमात एम. ए. पानगल व बी. क्यू. के. या दोन्ही शाळा व कनिष्ठ महविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. प्रारंभी पानगल ऊर्दू प्रशाला ीं बी क्यू के च्या शिक्षकांनी आपले मनोगत व्यक्त केले व सौ. कमर शेख यांच्या कार्याचे कौतुक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मो.अली शेख यानी केले तर पाहुण्यांचे आभार महेबूब सौदागर यानी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मोहसीन माशाल, अल्ताफ सिद्दीकी, मेहमूद खतीब, जैनब कातनघर, सना मुल्ला, अंजुम शेख आदींनी परिश्रम घेतले.

## भाजपा प्रदेश कार्यकारिणी विशेष निमंत्रित सदस्यपदी पाटील



✔ **पिलीव** : भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणी विशेष निमंत्रीत सदस्यपदी भाजपचे केशवराव कृष्णराव पाटील यांची फेरनिवड करण्यात आल्याचे भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी जाहीर केले आहे. माळशिरस तालुक्यासह सोलापूर जिल्हात भाजपा वाढीसाठी तसेच भाजपचे विचार तळागाळापर्यंत पोहोचवण्यासाठी के के पाटील यांनी प्रामाणिकपणे काम करणाऱ्या पैकी के के पाटील आहेत.माळशिरस तालुक्यातील राजकारणात त्यांनी आपली एक वेगळी छाप सोडली आहे. ते माळशिरस पंचायत समितीचे तिनवेळा सदस्य राहीले आहेत. एक अभ्यासु व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांच्याकडे पाहीले जाते.माढा लोकसभा मतदारसंघ तसेच माळशिरस विधानसभा निवडणुकीत विद्यमान आमदार रामभाऊ सातपुते यांना निवडून आणण्यात त्यांचा मोलाचा वाट होता.जुन्या तसेच नव्या कार्यकत्यांनमधे त्यांच्या निवडीमुळे आनंदाचे वातावरण आहे. ते सोलापूर जिल्हा नियोजन समीतीचे सदस्यही आहेत त्यांच्या कडुन विकासकामापासुन वंचीत असणाऱ्या गावांना विकास निधी मिळेल अशी मोठी अपेक्षा त्यांच्या कडुन आहेत.त्यांच्या निवडीचे सर्व स्तरातुन अभिनंदन व कौतुक होत आहे.

## संभाजी ब्रिगेडच्या शहरअध्यक्षपदी ननवरे



✔ **सोलापूर** : सोलापूर शहर संभाजी ब्रिगेडच्या शहराध्यक्षपदी प्रकाश ननवरे यांची तर जिल्हा कार्याध्यक्षपदी कृष्णा पवार यांची एकमताने निवड करण्यात आली. संभाजी ब्रिगेडच्या सक्षमीकरण आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. यामध्य सोलापूर शहर व जिल्हा संभाजी ब्रिगेडच्या पदाधिकारी निवड करण्यात आली. या बैठकीस संभाजी ब्रिगेडचे प्रदेश संघटक उमाकांत उपाडे, प्रदेश सह संघटक सुबोध औंधकर, केंद्रीय कार्यकारणी सदस्य दिनेश जगदाळे, जिल्हाध्यक्ष सोमनाथ राऊत, यांच्याहस्ते निवडीचे पत्राचे वाटप करण्यात आले यावेळी मराठा सेवा संघाचे शहराध्यक्ष सदाशिव पवार, मराठा सेवा संघाचे जिल्हा सचिव प्राध्यापक लक्ष्मण महाडिक, तर यावेळी विविध पदाधिकारी यांची निवड करण्यात आली यावेळी संभाजी ब्रिगेडचे उपाध्यक्ष अजय सोमदळे, बार्शी तालुकाध्यक्ष आनंद काशीद, अक्कलकोटचे गंगणे, मोहोळचे अभिजीत भोसले, उत्तर तालुकाध्यक्ष नितीन भोसले राजेश गुंड, प्रकाश सातपुते, राम भोसले, विष्णू मुळे, किसन गायकवाड रमेश जाधव, सचिन चव्हाण, सतिश क्षिरसागर, नितिन मोहीते, प्रकाश डोंगरे, चेतन करंडे उपस्थित होते.

## सोमोयेर स्मृतीमालाफ लघुपट प्रदर्शित

✔ **सोलापूर** : मसोमोयेर स्मृतीमालाफ (काळाच्या ओघातील आठवणी) नावाचा रॉयल स्टॅग बॅरल सिलेक्ट लार्ज शॉर्ट फिल्म्सने आज नवीनतम लघुपट प्रदर्शित केला.गौतम घोष दिग्दर्शित ३५ मिनिटांच्या या चित्रपटात, कोलकात्याच्या मध्यभागी राहणाऱ्या एका जोडप्याच्या - चाळीशीच्या उत्तरार्धातील एक लेखक,कबीर बसू (सुमन मुखोपाध्याय यांनी साकारलेली भूमिका),आणि त्यांची पत्नी सुमिता (गार्गी रॉय चौधरी यांनी साकारलेली भूमिका) या शिक्षकेच्या दृष्टीकोनातून,लॉकडाऊनमुळे निर्माण झालेल्या अनिश्चिततेची आणि अस्वस्थतेची भावना दाखवण्यात आली आहे.चित्रपट निर्माते गौतम घोष म्हणाले,महामारीच्या काळात अनुभवलेल्या भावना ३५ मिनिटांत टिपणे जवळजवळ अशक्य आहे.सोमोयेर स्मृतीमाला हा कोलकात्यात राहणाऱ्या एका जोडप्याच्या दृष्टिकोनातून महामारीच्या काळात आपल्या आजूबाजूचे जग कसे बदलले हे दाखवण्याचा प्रयत्न आहे.

## महाएकतातर्फे महाराष्ट्र दिन साजरा

✔ **सोलापूर** : महाएकता बहुउद्देशीय संस्थेतर्फे महाराष्ट्र दिन साजरा करण्यात आला. संस्थेतर्फे संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील हुतात्म्यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी विनोद जाधव यांनी आपले विचार मांडले. या कार्यक्रमात जावेद डिग्गे, औदुंबर काळे, श्रीकांत घोडके, प्रणव घोडके, मोबिन शेख, अमर घोडके, रामू निमगर आदी उपस्थित होते.

## तुकाराम साठे यांचे निधन




✔ **सांगोला** : लक्ष्मीनगर ता. सांगोला येथील रहिवासी आणि पत्रकार जगन्नाथ साठे यांचे वडील तुकाराम रामचंद्र साठे यांचे निधन झाले. निधनासमयी त्यांचे वय ६७ होते. त्यांच्या पश्चात मुलगा, सुन, पत्नी, दोन मुली, आणि नातवंडे आहेत. लक्ष्मीनगर ग्रामपंचायतीच्या माजी उपसरपंच स्वाती साठे यांचे ते सासरे होते.

# अक्कलकोटमधील निवडणूक यंदा प्रथमच शांततेत

✔ सुराज्य/अक्कलकोट

**अक्कलकोट तालुक्यातील कुठलीही निवडणूक असली की, भांडण, तंटे, कोर्ट, कचेरी अशा घटना नेहमी गृहीत धरल्या जात असे. नुकतीच दुधनी, अक्कलकोट दोन्ही कृषी उत्पन्न बाजार समितीची निवडणूक अत्यंत चुरशीने झाली. विरोधकांच्या टीकेला दुर्लक्ष करीत शांत संयमाने प्रतिउत्तर न देता आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी अंडरग्राउंड राहवून काम केले. म्हणून यंदा प्रथमच निवडणूक शांततेत पार पडण्यास मदत तर झालीच शिवाय यशही मिळाले, अशी चर्चा तालुक्यात आहे.**



मागील वीस वर्षांपासून अक्कलकोट तालुक्यात विधानसभा, लोकसभा, जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिका, बाजार समिती, सोसायटी, ग्रामपंचायत अशी कुठलीही निवडणूक असो, मारामारी, भांडण, तंटे, वादविवाद, गुन्हे दाखल, अशा अनेक प्रकारच्या घटना सतत घडत होत्या. यामुळे संपूर्ण महाराष्ट्रात अक्कलकोट तालुका गुन्हेगारी म्हणून शेगांव खून घटनेत परिचित झाला होता. नुकत्याच झालेल्या बाजार समिती निवडणुकीत पूर्वीचे नेते माजी आमदार सिद्रामप्पा पाटील, आ. सचिन कल्याणशेट्टी विरुद्ध माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे अशीच लढत यंदाही झाली. म्हेत्रे विरुद्ध पाटील हे पारंपरिक राजकीय विरोधक असले तरी तंटे विरहित निवडणूक होण्यासाठी आ.कल्याणशेट्टी यांची महत्वाची भूमिका ठरल्याची चर्चा रंगली आहे.

बाजार समिती निवडणुकीत सत्ताधारी -विरोधक यांच्यात आरोप प्रतिआरोप असे आठ दिवस प्रचाराप्रसंगी शीतयुद्ध रंगले होते. त्याप्रसंगी केवळ मतदारांपर्यंत कॉन्टॅक्ट करणे, आपलेसे करून घेणे, विकास मुद्द्यावर समजावून सांगणे, हे सर्वकाही कामे केवळ आपल्या ठरलेल्या ऑफिसमध्ये बसून हाताळले. एकदाही मतदार संघात फिरकले नसून केवळ कार्येकर्त्यांच्या जिवावर निवडणूक जिंकून आणली आहे. आरोप प्रत्यारोप सुरू असताना कल्याणशेट्टी कुटुंबियांनी मात्र एकदाही प्रतिक्रिया दिली नाही.

आ. सचिन कल्याणशेट्टी यांनी शांत, सयंमी राहून निवडणूक हाताळली. विकास कामांवर चर्चे ला भर दिला. कोणत्याही प्रकारचा गाजावाजा न करता अंडरग्राउंड राहून काम केले. विरोधाकांच्या टिका टिप्पणीला दुर्लक्ष करीत मौन बाळगून एकही त्या कालावधीत प्रतिक्रिया दिली नाही. यामुळे अत्यंत चुरशीने झालेली निवडणूक शांततेत पार पडण्यास मदत झाल्याची चर्चा आहे.

अक्कलकोट, दुधनी बाजार समिती निवडणुकीत आचारसंहिता बाबत सत्ताधारी व विरोधक यांच्या बरोबर निवडणूक प्रसंगी चर्चा झाली होती. दोघांनी काहीही होणार नाही, काळजी करू नका असा शब्द दिला होता. तरीही आमचा पोलीस बंदोबस्त ज्या प्रमाणात हवा, त्या प्रमाणात ठेवण्यात आला. त्यामुळे कुठेही अनुचित घटना घडल्या नाहीत. एकंदरीत निवडणूक शांततेत पार पडली.

**-राजेंद्रसिंह गौर, (उपविभागीय पोलीस अधिकारी)**

**आ. कल्याणशेट्टी व शिवराज म्हेत्रे यांच्यात शाब्दिक चकमक तरीही शांततेत निवडणूक:** मतदानादिवशी दुधनी मतदान केंद्रावर मतदारांची एक बस मतदानासाठी जात होती. तेव्हा शिवराज म्हेत्रे यांनी बस अडवून रिंगणाच्या आत जाऊ देणार नसल्याची भूमिका घेतली. तेव्हा दोघां मध्ये काहीसा वादविवाद झाला. तेव्हा एका सहायक पोलीस निरीक्षक यांच्या हस्तक्षेपामुळे वाद शांत होऊन सुरळीत पणे मतदान झाले. याचा व्हिडीओ सोशल मीडियावर फॉरवर्ड करीत अनेकांनी स्टेटसला ठेवला. मैंदर्गी केंद्रावर म्हेत्रे व पाटील रिंगणाच्या आत बसले असता. तेव्हा पोलीस अधिकाऱ्यांनी हस्तक्षेप करीत दोघांना रिंगण बाहेर पाठवत, एका चिन्हांचे झेंडा, फलक काढत कोणत्याही प्रकारची आचारसंहिता भंग होणार नाही याची काळजी घेण्यास सांगितले.

# प्री-वेडिंग न करण्याबाबत कासार समाजाच्या मेळाव्यात शपथ

✔ सुराज्य/सोलापूर

जैन कासार विकास प्रतिष्ठान व जैन कासार समाज संस्थेच्या वतीने आयोजित केलेल्या कासार समाज वधू-वर मेळाव्यात उपस्थित वधू-वरांना व पाचशेच्या वर पालकांना प्री-वेडिंग शुटिंग न करण्याबाबत शपथ देण्यात आली.

हिराचंद नेमचंद धर्मशाळेत झालेल्या कासार समाज वधू-वर पालक परिचय मेळाव्यात महाराष्ट्र तसेच कर्नाटक राज्यातील ३५० वधू-वर उपस्थित होते. पन्नास वर पालकांनी आपल्या पाल्यांचा परिचय करून दिला. यावेळी व्यासपीठावर प्रतिष्ठानचे अध्यक्ष हुकुमचंद हेसे, जैन कासार संस्थेचे अध्यक्ष पोपटलाल डोर्ले (सांगली), उपाध्यक्ष विजयअण्णा कासार (पुणे), सो.क्ष. कासार समाजाचे अध्यक्ष शरद भांडेकर, कासार विचार मंचचे ज्येष्ठ पत्रकार जयप्रकाश दगडे, उपाध्यक्षा माणिकताई व्यवहारे, स्वागताध्यक्ष संजय ऊर्फ पप्पू कंदले, गोविंदराव अंधारे, प्रा.सुभाष दगडे (पुणे) यांची प्रमुख उपस्थिती होती. जैन कासार समाज संस्थेचे उपाध्यक्ष राजेंद्र येवनकर (बार्शी) यांच्या हस्ते या मेळाव्याचे उद्घाटन झाले. या मेळाव्यासाठी महाराष्ट्र, कर्नाटकमधून वधू-वर व पालक उपस्थित होते. प्रारंभी स्वागताध्यक्ष संजय कंदले यांनी सर्वांचे स्वागत करून प्रास्ताविक केले. दीपप्रज्वलनाने मेळाव्यास प्रारंभ झाला. मेळावा यशस्वी करण्यासाठी प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष बाबुराव तंगा, कांतीलाल नळे, महावीर दुरुगकर, अभिनंदन अगरथडे, सचिन पाटील, महावीर लाळे, विक्रांत बशेट्टी, राजेश मोहोळकर, महेश नळे, राजू सासवडे आदींनी परिश्रम घेतले.



**दानशूर व्यक्तींचा गौरव**

या मेळाव्यास व चिंतामणी पार्श्वनाथ शैक्षणिक फंडास मदत करणाऱ्या विलास कंदले, सुनील विभुते, राजेंद्र येवनकर, उमेश सगरशेट्टी, मनिषा निनगूरकर, प्रा.सुभाष दगडे यांचा स्मृतीचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

# पत्रकारांच्या गृहनिर्माण प्रकल्पास कायम सहकार्य असेल : कांगणे

✔ सुराज्य/सोलापूर

सोलापुरातील पत्रकारांसाठी उभारण्यात येत असलेल्या गृहनिर्माण प्रकल्पासाठी नगर भूमापन अधिकारी म्हणून आपले यापुढेही कायम सहकार्य असेल, असे मनोगत नगर भूमापन अधिकारी किरण कांगणे यांनी व्यक्त केले.

पत्रकार भवन लगत साकारण्यात येत असलेल्या पत्रकार गृहनिर्माण प्रकल्पासाठी सहकार्य केल्याबद्दल नगर भूमापन अधिकारी सोलापूर किरण अशोक कांगणे आणि सौ. प्रतिभा कांगणे यांचे सोलापूर श्रमिक पत्रकार सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या वतीने आभारपत्र देऊन आभार मानण्यात आले.

याबाबत कांगणे म्हणाले, शहराच्या मध्यवर्ती भागातील, सात रस्ता परिसरात, पत्रकार भवन लगत, सिटी सर्व्हे नंबर २३२ या रहिवासी क्षेत्र राखीव २ एकर शासकीय भूखंडावर शहरातील पत्रकारासाठी गृहनिर्माण प्रकल्प उभारण्यात येत आहे. समाजाच्या समस्या मांडण्यासाठी कायम अग्रेसर असलेल्या पत्रकारांना हक्काचे घरकुल मिळत आहे, याचा आपल्याला आनंद होत आहे. पत्रकारांच्या गृहनिर्माण प्रकल्पासाठी यापुढेही आपले कायम सहकार्य असेल, असेही श्री कांगणे म्हणाले. याप्रसंगी सोलापूर श्रमिक पत्रकार सहकारी गृहनिर्माण संस्थेचे मुख्य प्रवर्तक प्रशांत माने, पत्रकार प्रीतम पंडित, कॅमेरामन अनिल कांबळे आदि उपस्थित होते.

सोलापूर येथील प्रस्तावित उड्डाणपूल, व रेल्वे भूंसपादनाचे मोजणीचे कामही जलद गतीने करुन दिले. तसेच, शहरातील मिळकत पत्रिका व ऑनलाईन केले. महानगर पालिकेचे ४० ते ५० वर्षापासून ३८ मिळकतपत्रिकेवर तांत्रिक अडचणीमुळे नोंदी नव्हते. जवळ जवळ ५०० कोटीचे मिळकतीवर, हितसंबंधित धारकांचे सुनावणी घेऊन श्री.कांगणे यांनी महानगरपालिका सोलापूरचे नावे लावून दिले.



# जलयुक्त शिवार अभियानात निवडलेल्या १६६ गावांचा आराखडा तयार करा

### जिल्हास्तरीय सनियंत्रण बैठकीत जिल्हाधिकाऱ्यांच्या सूचना

✔ सुराज्य/सोलापूर

जलयुक्त शिवार अभियान २.० साठी जिल्ह्यातून निवडण्यात आलेल्या १६६ पैकी १३१ गावांमध्ये शिवारफेरी झाली आहे. मात्र ३५ गावांमध्ये शिवारफेरी झाली नाही. या गावांमध्ये शिवार फेरी तात्काळ पूर्ण करून निवडलेल्या सर्व गावांचा गाव आराखडा आठवडाभरात तयार करावा, असे सूचना जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांनी दिल्या

जिल्हास्तरीय सनियंत्रण समिती जलयुक्त शिवार २.० ची बैठक जिल्हाधिकारी यांच्या दालनात झाली. या बैठकीस जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी बाळासाहेब शिंदे, जिल्हा जलसंधारण अधिकारी पी. बी. भोसले, वरिष्ठ भूवैज्ञानिक एम. जे. शेख, जिल्हा जलसंधारण अधिकारी तथा समितीचे सदस्य सचिव द. यो. दामा यांच्यासह उपविभागीय जलसंधारण अधिकारी, तालुका कृषि अधिकारी व समितीचे सदस्य उपस्थित होते.

जलयुक्त शिवार २.० साठी गावे निवडून एक महिना पूर्ण झाला आहे. परिणामी गाव आराखडा तयार करणेकामी जलसंधारण, कृषि अशा संबंधित सर्व विभागानी परस्पर समन्वय ठेवावा. येत्या आठवडाभरात, संबंधित उपविभागीय अधिकारी यांच्याकडे बैठका घेऊन, सर्व संबंधित यंत्रणामध्ये समन्वय साधून, आराखडा पूर्ण करा पुढील आठवड्यानंतर पुन्हा याबाबत आढावा घेण्यात येईल, तोपर्यंत सर्वच तालुकास्तरीय समित्यांनी, गाव आराखडा पूर्ण करून, जिल्हा समितीकडे मंजुरीस्तव सादर करण्याचे आदेश ही यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.

# महापारेषणच्या व्यवस्थापकीय संचालकपदी डॉ. संजीव कुमार



✔ **सोलापूर** : डॉ. संजीव कुमार (आय.ए.एस.) हे महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित (महापारेषण) चे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक म्हणून दि. ३ रोजी रुजू झाले आहेत. ते २००३ च्या बॅचचे वरिष्ठ सनदी अधिकारी आहेत. त्यांनी दिनेश वाघमारे (आय.ए.एस) यांच्याकडून नुकताच पदभार घेतला आहे. दिनेश वाघमारे (आय.ए.एस.) यांची प्रधान सचिव, गृह मंत्रालय, महाराष्ट्र शासन येथे नियुक्ती झाली आहे. महापारेषणमध्ये रुजू होण्यापूर्वी डॉ. संजीव कुमार हे अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र शासन म्हणून कार्यरत होते. डॉ. संजीव कुमार हे जम्मू वैद्यकीय महाविद्यालयाचे पदवीधर आहेत. त्यांनी लंडनच्या किंग्ज महाविद्यालयातून सार्वजनिक धोरण आणि व्यवस्थापन या विषयात पदव्यूत्तर शिक्षण घेतले आहे.

# महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या पाठपुराव्याने गायकवाड वस्ती नवीन डीपी मंजूर



✔ **मोहोळ** : महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या पाठपुराव्याने गायकवाड वस्ती नवीन डीपी मंजूर करण्यात आला यामुळे त्यामुळे येथील नागरीकांनी मनसेच्या कार्यकार्या सोबत डीपीचे पुजन करून आनंदोत्सव साजरा केला

मोहोळ येथील गायकवाड वस्ती मोहोळ हद्दीतील तसेच जाधव वस्ती येथील शेतकरी गेल्या १० वर्षापासून जादा विज दाबा पासून वंचित होते त्यांना कमी दाबाने वीज पुरवठा होत असल्याने त्या ठिकाणी शेततळे असून सुद्धा शेतकऱ्यांना विजे आभावी पिकांना पाणी देता येत नव्हते. जनावराना पिण्यासाठी व चाऱ्यासाठी पाणी देता येत नव्हते महाराष्ट्र नवनिर्माण सेना मोहोळ तालुका यांच्या पाठपुरानुसार त्या ठिकाणी नवीन डीपी मंजूर करण्यात आला त्याचे उद्घाटन मनसे तालुका अध्यक्ष ड कैलास खडके, युवा नेते शाहूराजे देशमुख, जिल्हा मनसे सचिव वाघमारे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी विधानसभा अध्यक्ष विष्णू गायकवाड, मनसे तालुका उप आध्यक्ष राजू देशमुख, आकाश गायकवाड, गणेश गायकवाड,पपू जाधव,बाळू जाधव, आमोल पाटील,गणेश गायकवाड, अजित गायकवाड, शहर संघटक सुदाम शिंगाडे, आतुल घागरे, संदीप जाधव,बबन गायकवाड, नवीन डिपी बसवल्याने शेतकऱ्याच्या चेहऱ्यावर आनंद दिसत होता.सर्व शेतकऱ्यानी मनसे पदाधिकारी याचे आभार मानले यावेळी नागरिक व शेतकरी उपस्थित होते.

# पी.एम. किसान सन्मान निधी योजना : बँक खाते आधार

### ▶▶ क्रमांकाशी जोडण्याची सुविधा गावात ▶▶ निवासी उपजिल्हाधिकारी शमा पवार

✔ सुराज्य/सोलापूर

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेअंतर्गत पात्र शेतकरी कुटुंबास २००० रुपये प्रति हप्ता या प्रमाणे ६००० रुपये प्रति वर्षी लाभ देण्यात येतो. योजनेच्या १४ व्या हप्त्याचा लाभ मे अथवा जून २०२३ मध्ये जमा होणार आहे. हप्त्याच्या लाभासाठी बँक खाते आधारशी जोडणे बंधनकारक आहे. लाभार्थीना त्यांचे बँक खाते आधार क्रमांकाशी जोडण्याची सुविधा गावातील पोस्ट कार्यालयात उपलब्ध करुन देण्यात आल्याची माहिती निवासी उपजिल्हाधिकारी शमा पवार यांनी दिली.

जिल्ह्यातील एकूण १ लाख ९२ हजार शेतकरी लाभार्थीची बँक खाती त्यांच्या आधार क्रमांशी जोडलेली नाहीत. तसेच १ लाख ४१ हजार ३%० लाभार्थीनी पीएम किसान खात्याची ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण केली नाही. त्यामुळे सदर लाभार्थीना १४ व्या हप्त्याचा लाभ जमा होणार नाही. तसेच, जे लाभार्थी वारंवार संपर्क करुनही ई-केवासी पूर्ण करीत नाहीत त्यांची नोंद घेवून संबंधित लाभार्थीस अपात्र मार्क करण्याच्या सूचना प्राप्त झाल्या आहेत.

लाभार्थीना त्यांचे बँक खाते आधार क्रमांकाची जोडण्याची सुविधा त्यांच्याच गावातील पोस्ट ऑफिस मार्फत उपलब्ध करण्यात आली आहे. यासाठी आधार कार्ड, मोबाईल क्रमांक या कागदपत्राद्वारे इंडिया पोस्ट पेमेंट बँकेत आपल्या गावातील पोस्ट




कर्मचाऱ्यांमार्फत खाते उघडावे. सदरचे बँक खाते आपल्या आधार क्रमांकाची ४८ तासात जोडले जाईल. ही पध्दत अतिरीक्त कागदपत्राशिवाय करता येणार असल्याने अत्यंत सोपी व सुलभ आहे. बँक खाते सुरू करण्याची सुविधा आपल्याच गावातील पोस्ट कार्यालयात उपलब्ध असल्याने लाभार्थीना इतरत्र जाण्याची गरज पडणार नाही.

पी.एम. किसान योजनेतील प्रलंबित लाभार्थींची बँक खाते आयपीपीबी मध्ये उघडून ती आधार क्रमांक जोडण्यासाठी प्रत्येक तालुक्यात व जिल्ह्याच्या पोस्ट कार्यालयास गावनिहाय याद्या उपलब्ध करून दिल्या आहेत. त्याप्रमाणे गावातील पोस्ट मास्टर या लाभार्थीना संपर्क करून आयपीपीबीमध्ये बँक खाती सुरू करतील. योजनेच्या १४ व्या हप्त्याच्या लाभासाठी आधार संलग्न बँक खाते अनिवार्य केलेले असल्याने आयपीपीबीमार्फत १५ मे २०२३ पर्यंत गावपातळीवर सर्वत्र मोहीम राबवण्यात येत आहे.

# दूध उत्पादक अडकले कात्रीत

विरोधी पक्ष शांत तर सरकार सत्तेत मदमस्त

## ● पशुखाद्य महागले, उत्पादन घटले दूध संघांनी दर ही घटविले

✔ सुराज्य/सोलापूर

**गेल्या तीन ते चार महिन्यांपासून टिकून असलेला गाईच्या दुधाचा ३८ रुपयांचा दर गेल्या आठवड्यात एक ते दोन रुपयांनी कमी झाला आहे. दुग्धजन्य पदार्थांची आयात होणार असल्याची चर्चा, देशांतर्गत दूध पावडर व बटरचे कमी झालेले दर आदींमुळे दुधाचे दर कमी झाल्याचे सांगितले जात आहे. त्यात उन्हामुळे दूध उत्पादन घटले आहे. पशुखाद्य महागले आणि त्यात दुध संघांनी दर ही घटविले त्यामुळे दुध उत्पादक शेतकरी दुहेरी संकटात अडकले आहेत. यावर विरोधी पक्षात शांतता असून सरकार मात्र सत्तेत मदमस्त असल्याने शेतकऱ्यांना वालीच नसल्याचे चित्र निर्माण झाले आहे.**



जिल्ह्यासह राज्यातील बहुतांश शेतकरी दूध व्यवसायावर अवलंबून आहेत. राज्यात साधारण ७० सहकारी व ३०० पेक्षा खासगी दूध संघाद्वारे दोन ते सव्वादोन कोटी लिटर दुधाचे संकलन होते.त्यातील ४० टक्के दुधाची पावडर, बटर व अन्य दुग्धजन्य पदार्थ तयार होतात. तर साठ टक्के दूध ग्राहकांना पाउचमधून विकले जाते. शिवाय राज्यात २५ लाख लिटरच्या जवळपास दुधाची थेट ग्राहकांना विक्री केली जात आहे. कोरोनाच्या काळात मागणी घटल्याने दुधाचे दर कमालीचे खाली आले होते.

१६ ते १७ रुपये प्रतिलिटर दराने खरेदी केली जात होती. त्यानंतर दोन वर्षांत हळूहळू दूधदरात वाढ झाली.गेल्या तीन महिन्यांपासून दुधाला प्रतिलिटर ३८ रुपये दर मिळाले. चांगला दर, चारा, पाण्याची उपलब्धता आदींमुळे दूध उत्पादनाकडे शेतकऱ्यांच्या कल वाढला. त्यामुळे सात ते दहा टक्के दूध उत्पादन वाढले. मात्र गेल्या काही दिवसांपासून दूधदर प्रतिलिटर एक ते दोन रुपयांनी कमी करण्यात आले आहेत.

अलीकडे म्हशींच्याही नव्या आणि ज्यादा दूध देणाऱ्या जाती विकसित झाल्या आहेत. पण म्हैस ही गायीएवढे दूध देऊ शकत नाही. गायीच्या दुधाला म्हशीच्या दुधापेक्षा कमी पैसे मिळतात.त्यामुळे शेतकरी चारबाजूने संकटात सापडला आहे. अनेक शेतकरी जोडधंदा म्हणून दुग्धव्यवसाय करीत असतात. गेल्या सहा महिन्यांत पशुखाद्याचे दर दुपटीने वाढल्याने पशुपालन व दूध व्यवसाय अडचणीत आला आहे. पशुखाद्य दरवाढीने शेतकऱ्याचे कंबरडे मोडले आहे.जनावरांच्या चारा व्यवस्थापनाबरोबर पशुखाद्य व्यवस्थापनही महत्त्वाचा भाग आहे. त्याशिवाय अपेक्षित दूध उत्पादकता जनावरांकडून निर्माण करता येत नाही. अनेक पशुखाद्यांचा वापर केला जातो. मागील तीन महिन्यांपासून दुधाचे दर वाढल्याने शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण होते. परंतु त्याचवेळी दुधाचे दर वाढताच पशुखाद्याचेही दर वाढवण्यात आले. चाऱ्याचे हाल व त्याच्या जोडीला पशुखाद्याचे दर वाढल्याने शेतकरीवर्ग दुहेरी या कात्रीत सापडला आहे.

दुध संघांनी घेतलेल्या या निर्णयामुळे शेतकऱ्यांतून नाराजी व्यक्त होत असताना राज्य सरकारने याकडे गंभीरतेने लक्ष घालण्याची मागणी शेतकऱ्यांतून होत आहे. दूध खरेदी धोरण पावडर, बटर खरेदीवर अवलंबून आहे. सरकार दूध पावडर, बटर व अन्य दुग्धजन्य पदार्थांची आयात करणार असल्याची चर्चा सुरू आहे. त्याचा दूध पावडर, बटर खरेदीदारांनी गैरफायदा घेतला. त्याचा परिणाम म्हणून पावडरचे दर साधारण ३० रुपयांनी कमी झाले. परिणामी, दुधाचे दर कमी झाल्याचे सांगितले जात आहे. दुग्धजन्य पदार्थांच्या आयात धोरणाबाबत शासनाने भूमिका स्पष्ट करावी, असे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. उन्हाची तीव्रता अधिक आहे.

उन्हामुळे दरवर्षीप्रमाणेच यंदाही दहा टक्के उत्पादन घटले आहे. पशुखाद्याच्या दरातही वाढ झाली आहे. त्यात दुधाचे दर कमी झाल्याने शेतकरी दुहेरी कोंडीत सापडला आहे. उन्हाळ्यात दरवर्षी दूध व दुग्धजन्य पदार्थांना मागणी असते. यंदा पहिल्यांदाच उत्पादन कमी आणि दरही कमी अशी स्थिती आहे.



## वयोवृद्ध रेशन धारकाचे बायोमेट्रिक होत नसल्याने पर्यायी मार्ग काढा : शिंदे

✔ **अकलूज** : शासनाने स्वस्त धान्य दुकानात असलेल्या बायोमेट्रिक प्रणालीवर अंगठा लावा आणि धान्य मिळवा' असा उपक्रम सुरू केला आहे.रेशन माफियांचा होणारा काळाबाजार रोखण्यासाठी हा उपक्रम चालू केला असून याचा लाभ अनेक रेशन धारकांना होत आहे.परंतु असंख्य रेशन धारक हे वयोवृद्ध असल्याकारणाने त्यांचे बायोमेट्रिक होत नाही. असे अनेक वयोवृद्ध रेशन धारक आहे त्यांच्या घरात कोणीच नाही त्यामुळे त्यांचे उपजीविका भरण्यासाठी शासनाच्या माध्यमातून त्यांना रेशन दिले जाते परंतु बायोमेट्रिक होत नसल्याकारणाने त्यांना आपल्या रेशन द्वारे मिळणाऱ्या उपजीविकेपासून वंचित राहावे लागत आहे त्यामुळे अशा लोकांना वंचित न ठेवता त्यांना तालुक्यातील सक्षम अधिकारी यांनी म्हणजेच तहसीलदार, तालुका पुरवठा अधिकारी, मंडलाधिकारी किंवा तलाठी यापैकी एखाद्या अधिकाऱ्यांनी चलन पावतीवर त्यांना रेशन देण्याची व्यवस्था करावी. तसेच संबंधित सक्षम अधिकारी यांनी रेशन दुकानदाराला असे आदेश देण्यात यावेत याकरिता निवेदनाच्या माध्यमातून जिल्हाधिकारी कार्यालयाकडे मैत्री प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य वतीने निवेदन देण्यात आले व १० जुलै रोजी बेमुदत धरणे आंदोलन करणार असा इशारा देण्यात आला आहे. यावेळी मैत्री प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष महेश शिंदे व तालुका उपाध्यक्ष शंकर मस्के आदी उपस्थित होते.

## कुसूर येथे सत्संगाचे आयोजन

✔ **सोलापूर** : बुद्ध पौर्णिमेनिमित्त कुसूर येथे सत्संगाचे आयोजन साधना कुठे सत्संग मंडळ भंडारकवठे व श्री पांडुरंग भजन मंडळ कुसुर यांच्या संयुक्त विद्यमाने श्री विठ्ठल मंदिर कुसुर येथे दि. ५ मे रोजी सायंकाळी पाच वाजता श्री विठ्ठल शास्त्रीजी शिरनाळ तालुका चडचण जिल्हा विजयपूर यांच्या रसाळ वाणीतून सत्संग व प्रवचन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. साधना कुटीच्या माध्यमातून वर्षभरामध्ये प्रत्येक पौर्णिमेला सीना भीमा खोऱ्यातील पंचक्रोशीतील प्रत्येक गावामध्ये सत्संगाचे आयोजन करण्यात आले आहे. याआधी श्री धानम्मा देवी मंदिर खानापूर श्री ज्ञानेश्वर मंदिर वडापूर येथे सत्संग कार्यक्रम झाले असून हे तिसरे सत्संग कुसुर येथे संपन्न होणार आहे. पंचक्रोशीतील सदभक्ताने याचा लाभ घ्यावा असे संयोजक श्री पांडुरंग भजन मंडळ कुसुर कुसुर व साधना कुठे सत्संग मंडळ भंडारकवठे यांच्या वतीने कळविण्यात येत आहे.



## आचेगांव येथे महाराष्ट्र दिन व कामगार दिन साजरा

✔ **अक्कलकोट** : आचेगांव (ता.दक्षिण सोलापूर) येथे ग्रामपंचायत कार्यालय व जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळेत महाराष्ट्रदिन व कामगार दिन या निमित्ताने ध्वजारोहण व प्रतिमा पूजन करण्यात आले. जिल्हापरिषद प्राथमिक शाळेत देशाचे पहिले कामगारमंत्री तथा घटनाकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन भाजप अनु. जाती तालुकाध्यक्ष माजी सरपंच बलवान गोतसुर्वे व सूर्यकांत धुते यांच्या हस्ते करण्यात आले व ध्वजारोहण ओगसिद्ध खांडेकर (मेजर) यांच्या हस्ते करण्यात आले तर ग्रामपंचायत समोरील ध्वजारोहण सरपंच सौ. विश्रांती पाटील यांच्या हस्ते करण्यात आले कार्यक्रमच्या अध्यक्षस्थानी सरपंच सौ. विश्रांती पाटील हे होते. यावेळी उपसरपंच रफिक मुल्ला, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष दिनेश गोतसुर्वे, मुख्याध्यापक राजशेखर कोळी, ग्रामपंचायत सदस्या मंगल गोतसुर्वे, गौतमी गोतसुर्वे, जयश्री खांडेकर, रेश्मा पाटील, ग्रामपंचायत सदस्य नागप्पा कांबळे, मलकारी कोरे, राजकुमार उपाध्ये, शशिकला विधाते आदी उपस्थित होते. प्रास्ताविक व स्वागत शिवानंद भीमाण्णवरू यांनी केले.यावेळी मनोगतात माजी सरपंच बलवान गोतसुर्वे यांनी महाराष्ट्रदिनव कामगार दिनाबद्दल माहिती सांगितली. सरपंच विश्रांती पाटील यांनी देखील मनोगत व्यक्त केले. यावेळी मल्लू शिलेणी, नित्यानंद खोबण, शिक्षक अशोक सोलापुरे, नागनाथ पोतदार,शिक्षिका प्रतिभा दूधगी, गीता माडकर,शावरसिद्ध माळी, हिरा उपाध्ये, सिद्धू नवगिरे, उत्तरेश्वर सुर्वे, रवी विधाते आदिसह पालक शिक्षक-शिक्षिका, अंगणवाडी सेविका विध्यार्थी, गावकरी उपस्थित होते. आभार मुख्याध्यापक राजशेखर कोळी यांनी मानले.

## दिल बेधुंद चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला

✔ **सोलापूर** : प्रेमकथेवर आधारीत तयार होणारे त्याच त्याच धाटणीचे चित्रपटही त्याला काही अंशी कारणीभूत असतात.पण अर्थात,सगळेच चित्रपट असे एकाच मुशीतून काढलेले नसतात बरं! अशीच एका वेगळ्या मुशीतली प्रेमकथा प्रेक्षकांसमोर सादर करण्यासाठी 'दिल बेधुंद' सज्ज झालाय ! आधी टायटल आणि नंतर पोस्टर लाँचला प्रेक्षकांचा तुफान प्रतिसाद मिळाल्यानंतर 'दिल बेधुंद'चा ट्रेलरही त्याच उत्साहात लाँच झाला. या ट्रेलरलाही प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.चित्रपटात प्रमुख भूमिका साकारणारा हंसराज जगताप याची वेगळी ओळख मराठी प्रेक्षकांना करून देण्याची गरजच नाही. 'धग'मधल्या त्याच्या अभिनयाला स्पेशल ज्युरी नॅशनल अवॉर्ड मिळाला होता. त्यामुळे मराठी जनमाणसात तो सहज जाऊन पोहोचला.जयेश चव्हाण,आरती कुथे,नितीन पात्रीकर, प्रदीप रोंगे,संयोनी मिश्रा,धीरज तरुणे आणि गोविंद चौरसिया यांच्याही चित्रपटात भूमिका आहेत.१९ मे रोजी हा चित्रपट दिमाखात महाराष्ट्रातल्या चित्रपटगृहांत प्रदर्शित होणार आहे. ओशियन कर्व्हज एंटरटेन्मेंटच्या बॅनरखाली तयार झालेल्या या चित्रपटाचे निर्माते शिवम पाटील आहेत. संतोष फुंडे यांनी चित्रपटाचं दिग्दर्शन केलं असून गुड्डू देवांगन यांनी कथा लिहिली आहे.

## लहुजी वस्तादतर्फे रक्तदान शिबिर

✔ **सोलापूर** : क्रांतीवीर लहुजी वस्ताद तरुण मंडळ लष्कर, सोलापूर यांच्यावतीने कामगार दिन व महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील व कामगार चळवळीतील अग्रणी नेते साहित्य सम्राट अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी मातंग समाजाचे अध्यक्ष भिमराव गायकवाड, लहुजी शक्ती सेनेचे प्रदेशाध्यक्ष सुरेश पाटोळे, संयोजक विश्वेश्वर गायकवाड, सूर्यकांत केंदळे, लखन गायकवाड, सनी म्हेत्रे, प्रवीण वाडे, विश्वजित लिंगराज, अतहर ब्लड बँकेचे हकीम शेख, महेश जोगदंड, शिवाजी पाटोळे, मुकेश गायकवाड आदी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी आदित्य पारधे, विकास जरिपटके, सुरज डोलारे, गणेश डोलारे, योगेश गायकवाड, गणेश भवाळे, अनुराग पारधे, राज भवाळे, शंभू केंदळे, ओम गवळी, राकेश जोगदंड, प्रेम जरिपटके आदींनी परिश्रम घेतले.

## मोडनिंबची सोंगे यंदा महाराष्ट्रात नंबर एक होणार : गोरे

✔ **मोडनिंब** : मोडनिंबचे ग्रामदैवत वेताळबाबा यात्रेतील सोंगे महाराष्ट्रात नंबर एक होणार आहेत, असा आत्मविश्वास अध्यक्ष कुरण गिड्डे यांनी व्यक्त केला. आ.मोडनिंब व परिसरातील गावात एकमेव व सर्वांचे ग्रामदैवत असलेल्या श्री वेताळबाबा यात्रेला वैशाख शुद्ध त्रयोदशी गुरुवारी दिनांक ४ मे ते सोमवारी ८ मे पासून पाच दिवस होणार आहे, अशी माहिती वेताळ देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष कुरण आण्णा गिड्डे, उपाध्यक्ष संभाजी लादे, सचिव विजय खेलबुडे यांनी दिली.

पारंपरिक पद्धतीने पाच दिवस चालणाऱ्या यात्रेत श्री वेताळ देवस्थान ट्रस्टच्या वतीने विविध सामाजिक उपक्रमाच्या मेजवानीचे आयोजन करण्यात आले आहे. त्याबरोबर पौराणिक कथावर आधारित तसेच आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून तयार करण्यात आलेली प्रसिद्ध अशी डिजिटल सोंगे सादर करण्यात



येणार आहेत. यामध्ये यंदा दिल्ली हून आणलेला विराट बजरंगबली -हनुमान व शंकर हे मुख्य आकर्षण असणार आहे. शुक्रवारी ५ मे पहाटे वेताळ देवाला सार्वजनिक महाअभिषेक व सायंकाळी देवाचा छबिना निघणार असुन पावसाची परंपरागत भाकणुक होणार आहे. सायंकाळी पौराणिककथावर आधारित सोंगाच्या गाड्या, शोभेचे दारुकाम होईल.देवाला नैवेद्य व नारळ वाहण्याचा कार्यक्रम होईल. शनिवारी ६ मे रोजी सकाळी देवाच्या पालखी सोहळ्याची मिरवणूक काढण्यात येणार आहे. सकाळी ९ वाजता ग्रामीण कलाकारांनी गाईलेली भेदी गाणी व कलगीतुरा असा कार्यक्रम होईल. संध्याकाळी डिजिटल युगातील कलाकार आधारित सोंगाच्या गाड्या निघणार आहेत. ७ मे रोजी दुपारी नेमुन दिलेल्या मल्लाच्या कुस्त्यांचे मैदान आयोजित करण्यात आले आहे.संध्याकाळी आधुनिक काळातील कलाकारांनी नटलेल्या विविध प्रकारच्या सोंगाच्या गाड्या व कलाकार हे यात्रेचे मुख्य आकर्षक असणार आहे. या यात्रा उत्सवात सहभागी व्हावे व शांतपणे यात्रा महोत्सवाचा आनंद घेण्याचे आवाहन श्री वेताळ देवस्थान ट्रस्ट यांचे वतीने अध्यक्ष कुरण आण्णा गिड्डे,उपाध्यक्ष संभाजी लादे, सचिव विजय खेलबुडे व यात्रेचे ईतर सर्व ट्रस्टी यांचे वतीने करण्यात करण्यात आले आहे.


## डॉ.स्वयंप्रभादेवी मोहिते-पाटील यांचा आज गोविंद गिरी महाराजांच्या हस्ते सन्मान

### नोबेल पुरस्काराचे नामांकन मिळाल्याबद्दल आयोजन

✔ सुराज्य/अकलूज

शिवशंकर बझारच्या चेअरमन आणि ज्येष्ठ समाजसेविका डॉ.स्वयंप्रभादेवी मोहिते-पाटील यांना जागतिक पातळीवरील शांततेच्या नोबेल पुरस्कारासाठी नामांकन जाहिर झाल्याबद्दल अकलूज येथे त्यांच्या भव्य नागरी सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती डॉ. स्वयंप्रभादेवी मोहिते-पाटील नागरी सत्कार समितीच्यावतीने शिवशंकर बझारचे व्यवस्थापक माने-देशमुख यांनी दिली.

शुक्रवार दि.५ मे रोजी दुपारी ३.३० वाजता येथील स्मृती भवन येथे राम जन्मभूमी तिर्थ क्षेत्र आयोध्याचे कोषाध्यक्ष व न्यासी श्री कृष्ण जन्मभूमी न्यास, मथुरा चे उपाध्यक्ष स्वामी श्री. गोविन्ददेव गिरी महाराज यांच्या हस्ते होणाऱ्या डॉ. स्वयंप्रभादेवी मोहिते-पाटील यांच्या सत्कार सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील तर राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचे पणतू तुषार गांधी यांची या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती असणार आहे. एकमेकां सहाय्य करू अवघे धरू सुपंथ या उक्तिप्रमाणे तळागाळातील व आर्थिक दृष्टीने कमकुवत, असहाय्य अशा लोकांना मदतीचा हात देऊन त्यांचे मोडलेले संसार व आर्थिक स्तर उंचावण्याचे काम डॉ.स्वयंप्रभादेवी मोहिते-पाटील यांनी केले आहे. त्यांच्या कार्याची, निस्वार्थी सेवेची जागतिक पातळीवर दखल घेऊन सन २०२३ मधील जागतिक दर्जाचा शांततेचा नोबेल पुरस्कार करीता स्वीडन व नॉर्वेच्या समितीकडून त्यांना नामांकन मिळाले आहे. याशिवाय निसर्ग संरक्षक व





मानद डॉक्टरेट पदवीनेही त्यांना सन्मानित करण्यात आले आहे. त्यांच्या या अतुलनिय कामगिरीबद्दल डॉ.स्वयंप्रभादेवी मोहिते-पाटील नागरी सत्कार समितीच्या वतीने त्यांच्या भव्य नागरी सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असल्याचे गोपाळराव माने देशमुख यांनी सांगितले.

याप्रसंगी डी एस गायकवाड लिखित स्वयंप्रभा स्वकथाया: निर्माता भव या पुस्तकाचे प्रकाशन होणार आहे. या कार्यक्रमास राजसिंह मोहिते-पाटील, जयसिंह मोहिते-पाटील, मदनसिंह मोहिते-पाटील, आ.रणजितसिंह मोहिते-पाटील, आ.राम सातपुते, धैर्यशील मोहिते-पाटील, संग्रामसिंह मोहिते-पाटील, सत्यशिल मोहिते-पाटील, अर्जुनसिंह मोहिते-पाटील, किर्तीध्वजसिंह मोहिते-पाटील, शिवतेजसिंह मोहिते-पाटील, विश्व शांतीदूत डॉ.सुधीर तारे, देहू संस्थान चे अध्यक्ष ह.भ.प. बापूसाहेब देहूकर, राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त ज्येष्ठ महिला भारूडकार चंदाताई तिवाडी, कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्टचे चंद्रकांत सहासने, आपुलकी सांस्कृतिक संस्थेच्या अध्यक्षा संजीवनी शिंदे, गीनिज बुक ऑफ वर्ल्ड फेम पारंपारीक धनगरी ढोल वादक बाळासाहेब मंगसुळे, ज्येष्ठ कवयित्री व काव्यशिल्प च्या अध्यक्षा मंदाताई नाईक यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

## कुंठणखाना चालवणाऱ्या पती-पत्नीवर गुन्हा

✔ **पंढरपूर** : शहरानजीक असणाऱ्या लक्ष्मी टाकळी येथील कुंठणखाण्यावर तालुका पोलिसांनी छापा मारून दोन महिलांची सुटका केली. याप्रकरणी कुंठणखाना चालवणाऱ्या पती-पत्नी विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तालुका पोलिसांना लक्ष्मी टाकळी हद्दीतील देवकते वस्ती येथे एका भाड्याच्या घरामध्ये वेश्याव्यवसाय सुरू असल्याची माहिती मिळाली होती. त्या माहितीच्या आधारे पोलिसांनी रात्री अचानक छापा मारून दोन महिलांची सुटका केली. तर सदर कुंटणखाना चालविणाऱ्या सागर परशुराम कांबळे रा. रामबाग रोड, त्याची पत्नी तसेच वेश्यागमनास आलेले सुभाष शिरसागर रा.टाकळी व अमोल मस्के रा.होळे अशा चौघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर पीडित महिलांची कुंटणखाण्यातून सुटका करण्यात आली असून पोलिसांनी त्यांची सामाजिक कार्यकर्त्यांच्या माध्यमातून शहरात राहण्याची तात्पुरती सोय देखील केली आहे.


## स्वामी समर्थमधील कलाकारांची बाळाप्पा मठ येथे भेट

✔ **अक्कलकोट** : महाराष्ट्र दिनाच्या पूर्वसंध्येला कलर्स मराठी वाहिनीवरील लोकप्रिय मालिका जय जय स्वामी समर्थ मधील समस्त कलाकारांनी गुरुमंदिर, बाळाप्पा मठ येथे भेट दिली. यावेळी अध्यात्मिक विषयांवर सखोल माहिती घेतली तसेच महाप्रसादाचा आस्वादही घेतला. याप्रसंगी मुख्य कलाकार अक्षय मुदावडकर, स्वानंद बर्वे, विजया बाबर, सतीश सलगरे तसेच गुरुमंदिरचे विद्याधर पारखे, आनंद कुंभार, पंडित सर, इरेश फसगे, विशाल अनगले उपस्थित होते.

## रेणुका पतसंस्था व नानासाहेब देशमुख सोसायटीत संचालक पदाच्या निवडी

✔ **नातेपुते** : नातेपुते येथील रेणुका ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था, रेणुका महिला ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था व समाजभूषण नानासाहेब देशमुख विकास सोसायटीच्या नूतन स्वीकृत संचालक पदाच्या निवडी रेणुका परिवाराचे सर्वेसर्वा सोलापूर जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष बाबाराजे देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली पार पडल्या.

यामध्ये रेणुका ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थेच्या स्वीकृत संचालक पदी रणजीत उत्तमराव काळे, गणेश कुंडलिक उराडे तसेच रेणुका महिला ग्रामीण



बिगर शेती सहकारी पतसंस्थेच्या स्वीकृत संचालक पदी आयशा सलीम काझी, रोहिणी शक्ती पलंगे यांची निवड करण्यात आली असून समाजभूषण नानासाहेब देशमुख विकास सोसायटीच्या स्वीकृत संचालकपदी सुरेश बंडगर, संतोष ख्रिस्ती, माऊली सरक यांची निवड करण्यात आली.यावेळी रेणुका पतसंस्थेचे चेअरमन तथा सोलापूर जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष बाबाराजे देशमुख, व्हॉ. चेअरमन महेश शेटे, रेणुका महिला पतसंस्थेचे चेअरमन सुचित्रादेवी देशमुख, व्हॉ.चेअरमन सुवर्णा पांढरे समाजभूषण नानासाहेब देशमुख विकास सोसायटीचे चेअरमन विलास काळे, व्हॉ.चेअरमन धनाजी देशमुख तसेच अर्जुन जठार उपस्थित होते.

अकलूज कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीमध्ये भरघोस मताने विजय मिळवल्याबद्दल बाबाराजे देशमुख, मामासाहेब पांढरे, ॲड.बी.वाय. राऊत, महावीर गांधी यांचा रेणुका परिवाराच्या वतीने सत्कार करण्यात आला. सदर कार्यक्रमासाठी पतसंस्था व विकास सोसायटीचे सर्व संचालक उपस्थित होते

## सोलापूर आयएमएच्या पदाधिकाऱ्यांचे पदग्रहण

✔ सुराज्य/सोलापूर

इंडियन मेडिकल असोसिएशनच्या सोलापूर शाखेच्या नव्या पदाधिकाऱ्यांचा पदग्रहण समारंभ नुकताच पार पडला. सर्वसाधारण सभेत नव्या पदाधिकाऱ्यांना पदभार देण्यात आला. डॉ. केदार कहाते अध्यक्ष, डॉ. शेखर चिडगुपकर उपाध्यक्ष, डॉ. रुपाली रायखेलकर, डॉ. हर्षवर्धन जोशी सचिव, डॉ. तन्वंगी जोग खजिनदार व डॉ. गौरी कहाते, डॉ. सरिता कोठाडिया संपादक अशी ही नवी कार्यकारिणी आहे.

## टोमॅटोची कवडीमोल दराने विक्री मोहोळमधील शेतकरी हवालदिल

✔ सुराज्य/चिखली

शेतकऱ्यांना कधी कोणते पीक आर्थिक लाभ मिळवून देईल तर कधी कोणते पीक डोळ्यात अश्रू आणेल हे काही सांगता येत नाही. असाच काय प्रकार मोहोळ तालुक्यात एका पिकाच्या बाबतीत झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. मोहोळ तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांनी आपल्या शेतात राब-राबून टोमॅटो पिकाची लागवड केली परंतु त्याच पिकाने शेतकऱ्यांच्या डोळ्यात अश्रू आणले आहे.

बाजारात टोमॅटोची विक्री कवडीमोल दराने होत असल्याने मार्केट मधून घराकडे येत असताना अनेक शेतकऱ्यांनी टोमॅटो रस्त्यांच्या कडेला फेकून दिली तर काही शेतकऱ्यांनी शेतातच सोडून दिल्याने अख्खा टोमॅटोचा फड सडून गेल्याचे पाहायला मिळाले आहे. टोमॅटोची लागवड मोठ्या प्रमाणात झाली आहे. याच टोमॅटोच्या पिकाला चांगला भाव येईल, अशी आशा शेतकऱ्यांना होती. मात्र शेतकऱ्यांच्या या आशेवर पाणी फिरले आहे. सध्या मार्केटमध्ये या टोमॅटोची विक्री ३ ते ४ रुपये दराने होत असल्याने शेतकरी वर्गातून चिंता व्यक्त करण्यात येत आहे. टोमॅटोची लागवड करीत असताना शेतकऱ्यांना त्यासाठी जमिनीची चांगली मशागत करावी लागते. त्यानंतर योग्य अंतरावर रोपांची लागवड केली जाते. रोप वाढत असताना काही महिन्यात त्याचा वेल तयार होतो. त्यानंतर शेतकऱ्यांना या टोमॅटोची बांधणी करावी लागते. त्यासाठी



बांबू व तारांचा वापर केला जातो. या तारांच्या सहाय्याने टोमॅटोची रोपे वाढू लागतात. याची वाढ होत असताना त्याला टोमॅटोचे फळ येऊ लागतात. हे टोमॅटोचे फळ लाल झाल्यानंतर त्याची बाजारात विक्री करण्यासाठी तोडणी केली जाते. टोमॅटोची लागवड ते काढणी या दरम्यान शेतकऱ्यांना लाखो रुपयांचा खर्च येतो. मात्र बाजारात टोमॅटोची विक्री प्रति किलो ३ ते ४ रुपये दराने होत असल्याने काही शेतकऱ्यांनी उभी पिके शेतात सोडून दिली आहेत तर काहींनी बाजारात नेलेला टोमॅटो भर रस्त्यात फेकून दिला आहे. विक्री होत असल्याने अनेक शेतकरी आर्थिक अडचणीत आले आहेत. काही शेतकऱ्यांनी तर व्याजाने पैसे घेऊन टोमॅटोची लागवड केली होती, त्यामुळे त्यांच्यासमोर आर्थिक संकट उभे राहिले आहे. शेतातून टोमॅटो बाजारात विक्रीसाठी घेऊन जात असताना मालवाहू टेम्पोच्या भाड्या एवढे ही पैसे शेतकऱ्यांना मिळत नसल्याने टोमॅटो तोडणीसाठी लावलेल्या मजुरांचे पैसे कशाने द्यावे हा प्रश्न शेतकऱ्यांनी उपस्थित केला आहे. यावेळी प्रसार माध्यमांशी बोलताना अनेक शेतकऱ्यांनी सांगितले की? एक एकर शेतीमध्ये टोमॅटोची लागवड केली तर. यासाठी साधारण सव्वा लाख रुपये खर्च येत आहे. बाजारात मात्र टोमॅटोची ३ ते ४ रुपये दराने विक्री होत आहे. टोमॅटो तोडणाऱ्या मजुरांना पैसे देण्यासाठी मजुरीचा खर्च देखील निघत नाही. रात्र-दिवस शेतात कष्ट करूनही फळ मिळत नसल्याने शेतकऱ्यांना आता वालीच उरला नाही केलेले कष्ट सुध्दा वायपट मातीत गेल्याने शेतकऱ्यांना आता शेती सोडून द्यायची पाळी आली आहे. मायबाप सरकारने याकडे तातडीने लक्ष देऊन मदत करावी असा संतप्त सवाल शेतकरी वर्गातून उपस्थित केला जात आहे.

# उत्तर प्रदेशात आणखी एका गँगस्टरचे एन्काऊंटर

सुराज्य/उत्तर प्रदेश

**उत्तर प्रदेशमध्ये आणखी एक एन्काऊंटर झाल्याची माहिती समोर येत आहे. कुख्यात गँगस्टर अनिल दुजाना हा या एन्काऊंटरमध्ये ठार झाला आहे. उत्तर प्रदेशच्या स्पेशल टास्क फोर्सने मेरठ येथे ही कारवाई केली. एएनआय या वृत्तसंस्थेने यासंदर्भातील वृत्त दिले आहे.**

उत्तर प्रदेश स्पेशल फोर्स टास्कचे अतिरिक्त पोलीस महासंचालक अमिताभ यश यांनी दिलेल्या माहितीनुसार, अनिल दुजानावर २५ गुन्हे दाखल होते. यामध्ये १८ गुन्हे हत्येचे होते. दंगल, दरोडा, लुटमार आणि खंडणीसारखेही गुन्हे त्याच्यावर दाखल होते. पश्चिम युपीचा कुख्यात गुंड अनिल दुजाना युपी एसटीएफच्या मेरठ युनिटसोबत झालेल्या चकमकीत ठार झाला. त्याच्यावर अनेक खटले होते. तो कॉन्ट्रॅक्ट किलर होता. त्याच्यावर १८ खुनाचे खटले होते. पुढील तपास सुरू आहे, अशी माहिती अमिताभ यश यांनी एएनआयला दिली.


## कॉन्ट्रॅक्ट किलर म्हणून होता प्रसिद्ध

**कोण आहे अनिल दुजाना?**

अनिल दुजानाचे मूळ नाव अनिल सिंग असे आहे. तो मूळचा उत्तर प्रदेशातील दुजाना गावातील असल्याने त्याची ओळखही तीच बनली. दोन भाऊ, बहिणीसह त्याच्या कुटुंबात पाचजण आहेत. ५.५ लाख रुपयांची चोरी करून त्याने २००२ साली एकाची हत्या केली होती. तेव्हापासून तो पोलिसांच्या रडारवर होता. अखेर आज झालेल्या चकमकीत तो मारला गेला.

**असदचे एन्काऊंटर**

गेल्या महिन्यातही उत्तर प्रदेशात एन्काऊंटर झाला होता. या चकमकीत कुख्यात गँगस्टर अतिक अहमदचा मुलगा असद अहमद मारला गेला. उमेश पालप्रकरणात तो पोलिसांच्या रडारवर होता. असद चकमकीत ठार झाल्यानंतर दोनच दिवसांनी अतिक आणि त्याचा भाऊ असदची मारेकऱ्यांनी हत्या केली.



## शैक्षणिक बनावट प्रमाणपत्र रॅकेट धाराशीवपर्यंत

**पुणे** : दहावी अनुत्तीर्ण असलेल्यांना दहावी उत्तीर्ण झाल्याच्या बनावट गुणपत्रिका आणि अन्य कागदपत्रे देणाऱ्या तिघांना गुन्हे शाखेच्या युनिट दोनच्या पथकांनी छत्रपती संभाजीनगर आणि धाराशीव येथून अटक केली. यापूर्वी गुन्हे शाखेने एकाला पुण्यात रंगेहाथ पकडून, त्याच्यावर स्वारगेट पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सरकारी नोकरीसाठीची किमान दहावी उत्तीर्ण असल्याची शिक्षणाची अट पूर्ण व्हावी, यासाठी संदीप ज्ञानदेव कांबळे (वय ३७, रा. सांगली) हा दहावी उत्तीर्ण नसलेल्यांना प्रमाणपत्र देत असल्याची माहिती गुन्हे शाखेच्या पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी विकी कांबळे याला बनावट ग्राहक म्हणून आरोपींकडे पाठवले. विकी पाचवी नापास आहे, असे आरोपीला सांगण्यात आले होते. त्यावर आरोपीने विकीला महाराष्ट्र राज्य ओपन स्कूलचे दहावीचे 'स्टेटमेंट ऑफ मार्क्स'चे प्रमाणपत्र आणि 'असेंट सेकंडरी अँड हायर सेकंडरी स्कूल'चे मूळ ट्रान्सफर सर्टिफिकेट' बनावट तयार करून आणून दिले. त्यासाठी आरोपीने विकीकडून ६० हजार रुपये आकारले. गुन्हे शाखेच्या पोलिसांनी त्याला रंगेहाथ पकडल्यानंतर स्वारगेट पोलिसात गुन्हा दाखल केला.



## राहुल गांधींची खासदारकी रद्द; याचिका सुप्रीम कोर्टाने फेटाळली

**नवी दिल्ली** : काँग्रेस नेते राहुल गांधी यांची खासदारकी रद्द केल्याबद्दलची याचिका सुप्रीम कोर्टाने फेटाळली आहे. कोर्टाने याचिकाकर्त्यालाही फटकारत तुम्ही कोण आहात? असा प्रश्न विचारला. तसेच कोर्टाने या याचिकेवर सुनावणी घेण्यास नकार दिला. केरळमधील रहिवासी असलेल्या आभा मुरलीधरन यांनी राहुल गांधींच्या प्रकरणाचा मुद्दा मांडत, ही याचिका दाखल केली होती. त्यांनी लोकप्रतिनिधी कायदा, १९५१च्या कलम ८(३) च्या घटनात्मक वैधतेला आव्हान दिले होते. त्यावर कोर्टाने कठोर भूमिका घेत तुम्ही कोण आहात? तुमचे सदस्यत्व रद्द झाले आहे का?, असे प्रश्न याचिकाकर्त्याला विचारले. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत राहुल गांधी यांनी कर्नाटकातील कोलारमध्ये मोदी आडनावाबाबत वादग्रस्त वक्तव्य केले होते. त्यानंतर राहुल गांधींवर गुन्हा दाखल करण्यात आला होता. सुरत न्यायालयाने राहुल गांधी यांना दोन वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा सुनावली आहे. त्यामुळे त्यांचे संसदेचे सदस्यत्व रद्द करण्यात आले आहे.



## अजित पवारांकडे अध्यक्षपद नको, माजी आमदारांचे वक्तव्य

**नागपूर** : राष्ट्रवादी काँग्रेस ज्येष्ठ नेते शरद पवार अध्यक्षपद सोडल्यानंतर नवा अध्यक्ष कोण? अशी चर्चा पूर्ण देशात सुरू आहे. पक्षातील नेत्यांनी, कार्यकर्त्यांनी आणि विरोधी पक्षांनी आपली पसंती अजित पवा, सुप्रिया सुळे आणि जयंत पाटील यांना दर्शविल्यामुळे अजूनच चर्चा होत आहे. अशावेळी राष्ट्रवादी काँग्रेसच्या माजी आमदार शालिनीताई पाटील यांनी अजित पवारांवर गंभीर आरोप करत त्यांना नापसंती दर्शविली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांचे आत्मचरित्र असलेल्या 'लोक माझे सांगाती' या पुस्तकाच्या दुसऱ्या भागाचे नुकतेच प्रकाशन करण्यात आले. या कार्यक्रमात शरद पवार यांनी सर्वांना धक्का देत राजकीय निवृत्तीची घोषणा केली. शरद पवार यांच्या निर्णयावर शालिनीताई म्हणाल्या की, 'ते माझ्यापेक्षा १० वर्षांनी लहान आहेत. मी आजही कामकाज पाहत आहे. त्यामुळे शरद पवार यांनी निवृत्तीचा निर्णय खूप घाईत घेतला असल्याचे शालिनीताई पाटील म्हणाल्या.'



## भाजपच्या राजकीय कुरघोडीमुळे नवीन महामंडळाचा घाट?

**मुंबई** : पायाभूत सुविधा विकास महामंडळ स्थापन करण्याच्या राज्य सरकारच्या निर्णयास राजकीय झालरही असून रस्ते विकास विभागाचा ताबा या माध्यमातून भाजपच्या मंत्र्यांकडे येणार आहे. रस्तेविकास महामंडळ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अखत्यारित असून राजकीय कुरघोडी करण्यासाठी नवीन महामंडळ हे भाजप नेते व सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण यांच्या ताब्यात दिले जाणार आहे. त्यामुळे ग्रामीण भागांमधील पायाभूत सुविधांच्या कामांची कंत्राटे देण्याचा अधिकार भाजपच्या मंत्र्यांकडे जाणार आहे. राज्य सरकारमधील खातेवाटपात सार्वजनिक बांधकाम खाते भाजपच्या रवींद्र चव्हाण यांच्याकडे देण्यात आले. तर सार्वजनिक उपक्रम हा विभाग शिंदे गटाकडे असून सध्या हे खाते मुख्यमंत्री शिंदे यांच्याकडे आहे. मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग, समृध्दी महामार्ग, यासह अनेक मोठे प्रकल्प रस्तेविकास महामंडळाने पूर्ण केले आहेत. त्यामुळे महामंडळ हे कोणतेही पायाभूत सुविधा प्रकल्प राबविण्यासाठी सक्षम असताना नवीन महामंडळाचा घाट कशासाठी व कोणासाठी घातला जात आहे, असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

## आयआयटी प्रवेशासाठी ७५ टक्के गुण आवश्यकच

### निकषांत हस्तक्षेप करण्यास न्यायालयाचा नकार

सुराज्य/मुंबई

**आयआयटी म्हणजेच अभियांत्रिकीच्या प्रवेशासाठी विद्यार्थ्यांना लागू असलेला ७५ टक्क्यांचा नियम शिथील करण्यात यावा, अशी याचिका उच्च न्यायालयात दाखल करण्यात आली होती. या याचिकेवर बुधवारी सुनावणी करण्यात आली.**



इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नोलॉजी (आयआयटी) मध्ये प्रवेश घेण्यासाठी उच्च माध्यमिक परीक्षेत ७५ टक्के गुणांचे पात्रता निकष शिथिल करण्याची मागणी करणारी जनहित याचिका मुंबई उच्च न्यायालयाने बुधवारी फेटाळून लावली आहे. याबाबत सुनावणी करताना प्रभारी मुख्य न्यायमूर्ती एस. व्ही. गंगापूरवाला आणि न्यायमूर्ती संदीप मारणे यांच्या खंडपीठाने सांगितले की, 'आता या टप्प्यावर ते हस्तक्षेप करू शकत नाही, त्यामुळे हे सरकारी अधिकाऱ्यांनी विचार करून निर्णय घ्यायचे आहे. या याचिकेवर याचिकाकर्ते आणि प्रतिवाद्यांचा मंगळवारी युक्तिवाद झाला होता. पण न्यायालयाकडून याबाबतचा निर्णय राखून ठेवला होता.'

या याचिकेवर सुनावणी करताना मुंबई उच्च न्यायालय म्हणाले की, 'या टप्प्यावर प्रवेश प्रक्रियेच्या चालू असलेल्या प्रक्रियेत आम्ही हस्तक्षेप करू शकत नाही. सरकारने विद्यार्थ्यांच्या तक्रारींचा विचार या आधीच करणे आवश्यक होते. त्यामुळे या वर्षी प्रसिद्ध करण्यात आलेल्या संयुक्त प्रवेश परीक्षेच्या (JEE) प्रगत माहितीपत्रकानुसार, उमेदवारांनी इयत्ता १२वीच्या बोर्ड परीक्षेत किमान ७५ टक्के गुण मिळवणे महत्त्वाचे असणार आहे.'

## नितीश यांना मद्य माफियाकडून दहा हजार कोटींचा मलिदा

सुराज्य/पाटणा

**बिहार भाजपाचे प्रदेशाध्यक्ष सम्राट चौधरी यांनी मुख्यमंत्री नितीश कुमार आणि जनता दल (युनायटेड) पक्षावर मोठा आरोप केला आहे. मद्य माफियाकडून नितीश कुमार आणि त्यांच्या पक्षाला दहा हजार कोटींची लाच मिळाली असल्याचे त्यांनी सांगितले.**

बिहारमधील भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष सम्राट चौधरी यांनी मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्यावर गंभीर आरोप केला. मुख्यमंत्री आणि त्यांच्या पक्षाने मद्य माफियांकडून दहा हजार कोटींची लाच घेतली असल्याचे ते म्हणाले. २०१६ साली जेव्हा दारूबंदी लागू केली, तेव्हापासून हा घोटाळा होत असल्याचेही ते म्हणाले.

ते म्हणाले की, 'बिहारमध्ये मद्य घरपोच केले जात आहे. मद्य माफियाने नितीश कुमार आणि जेडीयू पक्षाला या बदल्यात दहा हजार कोटी दिले. सरकार आणि मद्य माफियांचे संगनमत झाले असून राज्याचा हा अवमान आहे, अशी टीका सम्राट चौधरी यांनी केली.



सम्राट चौधरी यांचे आरोप जेडीयूने फेटाळून लावले. सम्राट चौधरी यांचे वक्तव्य हे दारूबंदीच्या विरोधात असल्याचे दिसते. तसेच त्यांनी आमच्यावर केलेले आरोप हे बिनबुडाचे आणि धादांत खोटे आहेत. आम्ही त्यांना खुले आव्हान देतो की, त्यांनी या आरोपाबद्दलचे पुरावे द्यावेत. जर सम्राट चौधरी यांनी नितीश कुमार यांच्यावर टीका केली नाही तर त्यांच्याकडे माध्यमे तरी कशाला लक्ष देतील? अशी टीका जेडीयूचे नेते अभिषेक कुमार झा यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

## ठाकरेंच्या कार्यपद्धतीवर शरद पवार नाराज



सुराज्य/मुंबई

महाविकास आघाडी सरकारच्या काळात तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या कार्यपद्धतीविषयी राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा शरद पवार यांनी केलेली टिप्पणी सध्या चांगलीच गाजत आहे. उद्धव ठाकरे हे मुख्यमंत्री असताना फक्त दोन वेळा मंत्रालयात गेले. ही बाब आमच्या फारशी पचनी पडणारी नव्हती, असे शरद पवार यांनी म्हटले होते. त्यांच्या या वक्तव्यावर उद्धव ठाकरे यांनी काहीशा सावधपणे आणि किंचितशा खोचकपणे प्रत्युत्तर दिले. शरद पवार यांनी पक्षाध्यक्षपद सोडण्याचा निर्णय हा राष्ट्रवादी काँग्रेसचा अंतर्गत प्रश्न आहे. मी त्यावर काहीही बोलणार नाही. यावर मी शरद पवार यांना सल्ला देण्याचा प्रश्नच येत नाही. मी त्यांना सल्ला कसा देणार? मी दिलेला सल्ला त्यांच्या पचनी पडला नाही तर काय करु, अशी मिश्किल टिप्पणी उद्धव ठाकरे यांनी केली. ते गुरुवारी मुंबईत आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत बोलत होते.

या पत्रकार परिषदेत उद्धव ठाकरे यांनी शरद पवार यांचा पक्षाध्यक्षपदाचा राजीनामा आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये सुरु असलेल्या घडामोडींवर सविस्तरपणे भाष्य करणे टाळले. त्यांनी म्हटले की, 'प्रत्येक पक्षाला आपापली ध्येयधोरणं ठरवण्याचा अधिकार असतो. त्यामुळे त्यांचा निर्णय होऊ दे, मग मी त्यावर बोलेन.' शरद पवार यांनी उद्धव ठाकरेंच्या कार्यपद्धतीविषयी केलेल्या टिप्पणीचा मुद्दाही पत्रकार परिषदेत उपस्थित झाला. त्यावर उद्धव ठाकरे यांनी म्हटले की, 'प्रत्येकाला आत्मचरित्र लिहिण्याचा आणि बोलण्याचा अधिकार आहे. मी मुख्यमंत्री म्हणून काय केलं, हे सगळ्यांना माहिती आहे. राज्यातील जनतेला मी कुटुंबप्रमुख वाटतो. यापेक्षा अधिक काही मला बोलायचे नाही. महाविकास आघाडीला तडा जाईल, असे कोणतेही वक्तव्य मी करणार नाही. शरद पवारांचा राजीनामा ही राष्ट्रवादीची पक्षांतर्गत बाब आहे. कार्यकर्त्यांचाही शरद पवार यांच्यावर अधिकार आहे. या सगळ्या पार्श्वभूमीवर शरद पवार सगळ्यांच्या हिताचा निर्णय घेतील, अशी अपेक्षा उद्धव ठाकरे यांनी व्यक्त केली.'

## हायकोर्टाच्या निर्णयानंतर मणिपूरमध्ये तणाव

**सुराज्य/मणिपूर** : मणिपूर उच्च न्यायालयाच्या एका आदेशामुळे येथे तणाव वाढला आहे. परिस्थितीवर नियंत्रण मिळवण्याकरता लष्कर आणि आसाम रायफल्स तैनात करण्यात आले आहे. मणिपूर नागरिक प्रशासनाच्या निवेदनानुसार राज्याच्या विविध भागात लष्कराचे फ्लॅग मार्च होत असल्याची माहिती लष्कराकडून देण्यात आली आहे. बुधवार सायंकाळपासून हे जवान तैनात करण्यात आले असून कायदा आणि सुव्यवस्थेच्या कारणास्तव नागरिकांना सुरक्षित स्थळी पोहोचवले जात आहे.

## पुन्हा आंदोलनाला बसावे लागणार नाही, शरद पवार यांचे माघारीचे संकेत

सुराज्य/मुंबई

**पक्षाच्या भवितव्यासाठी मी निर्णय घेतला. नवं नेतृत्व तयार करण्याच्या दृष्टीने मी संबंधित निर्णयापर्यंत पोहोचलो. पण माझ्या घोषणेनंतर पक्षातल्या सगळ्या सहकाऱ्यांची तीव्र भावना आहे. तुमच्या भावनांचा आदर करुन मी येत्या २ दिवसांत अंतिम निर्णय घेईन. तुमच्या भावना दुर्लक्षित होणार नाही, याची खरबरदारी घेईन. त्याचवेळी तुम्हाला २ दिवसांनी असं पायऱ्यांवर आंदोलनाला बसावं लागणार नाही, असं सांगत ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी माघारीचे संकेत देऊन पुन्हा अध्यक्षपद स्वीकारेन, असंच अप्रत्यक्षरित्या सांगितल्याचं बोललं जातंय.**



ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी निवृत्तीची घोषणा केल्यानंतर राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष मेहबूब शेख आणि राज्यभरातील युवक, युवतींच्या पदाधिकारी वाय. बी. चव्हाण येथे आंदोलनाला बसले होते. शरद पवार यांनी आपला निर्णय मायारी घ्यावा, यासाठी ते मनधरणी करत होते. गुरुवारी त्याच पदाधिकाऱ्यांशी शरद पवार यांनी संवाद साधला. यावेळी त्यांनी माझ्या निर्णयाचा फेरविचार करुन सहकाऱ्यांच्या भावना लक्षात घेऊन योग्य निर्णय घेईन, असं सांगितलं.

## बुधवारी राष्ट्रवादीचे ठरेल नव्या सरकारच्या घडामोडी

**सुराज्य/पुणे** : राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार यांनी पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदावरून निवृत्त होण्याच्या केलेल्या घोषणेनंतर राज्याच्या राजकारणात एकच खळबळ उडाली आहे. एकीकडे शरद पवार यांच्यावर आपला निर्णय मागे घ्यावा यासाठी पक्षातून दबाव वाढत आहे तर दुसरीकडे नवीन राष्ट्रीय अध्यक्ष नेमण्यासाठी देखील राष्ट्रवादीत बैठकांचे सत्र सुरु झाले आहे. तर सुप्रिया सुळे यांच्या नावावर राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून शिक्कामोर्तब होण्याची शक्यता देखील खात्रीलायक सूत्रांनी दिली आहे. अशातच आता राष्ट्रवादीच्या या पक्षांतर्गत भूकंपानंतर राज्याच्या राजकारणात देखील पुन्हा मोठा भूकंप होणार असल्याचे संकेत कायदेतज्ज्ञ असीम सरोदे यांनी दिले आहेत. रा. काँ.चे राष्ट्रीय अध्यक्ष, कार्याध्यक्ष, पदाधिकारी १० मे च्या आधी नक्की होतील आणि ११ मे नंतर नवीन सरकार स्थापनेच्या घडामोडींना वेग येणार हे सुद्धा नक्की असल्याचा दावा असीम सरोदे यांनी केला आहे.

# बिहारमधील जातनिहाय जनगणना तातडीने थांबली

### पटणा हायकोर्टाचे आदेश

सुराज्य/पटणा

**बिहारमधील जातनिहाय जनगणना पटणा उच्च न्यायालयाने गुरुवारी तातडीने थांबवली. आतापर्यंत गोळा केलेली माहिती कोणाला देऊ नका. ही माहिती नष्ट करु नका, असेही आदेश न्यायालयाने बिहार सरकारला दिले आहेत.**

---

मुख्य न्यायाधीश विनोद चंद्रन व न्या. मधुरेश प्रसाद यांच्या खंडपीठाने हे आदेश दिले. दोन दिवस याप्रकरणी सुनावणी झाली. त्यानंतर यावर अंतरिम आदेश देताना न्यायालयाने बिहार सरकारने सुरु केलेली जातनिहाय जनगणना थांबवली. मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्या सरकारने जातनिहाय गणना करण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी ५०० कोटींची तरतुद करण्यात आली. जानेवारी २०२३ मध्ये जातनिहाय जनगणना सुरु झाली. तिचा पहिला टप्पा पूर्ण झाला व दुसरा टप्पा सुरु झाला होता. याविरोधात सर्वोच्च न्यायालयात तीन याचिका दाखल झाल्या. सर्वोच्च न्यायालयाने याचिकाकर्त्यांना पटणा उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यास सांगितले. त्यानुसार पटणा न्यायालयात या याचिका दाखल झाल्या. मुख्य न्यायाधीश चंद्रन यांच्या खंडपीठासमोर या याचिकांवर सुनावणी झाली.

या याचिकांवर १ मेरोजी सुनावणी होणार होती. पटणा सरकारने दाखल केलेले प्रतिज्ञापत्र रेकॉर्डवर आले नसल्याने न्यायालयाने ही सुनावणी २ मेपर्यंत तहकूब केली. या सुनावणीत न्यायालयाने जातनिहाय गणनेबाबत राज्य शासनाला काही प्रश्न विचारले. जातनिहाय गणना नेमकी कशासाठी केली जाते आहे. यासाठी काही कायदा करण्यात आला आहे का, अशी विचारणा न्यायालयाने केली. महाधिवक्ता पी. के. शाही म्हणाले, 'विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात जातनिहाय गणनेचा निर्णय मंजूर झाला. गणनेसाठी ५०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली. हा राज्य शासनाचा धोरणात्मक निर्णय आहे. राज्यातील प्रत्येक घटकापर्यंत सरकारी योजना पोहोचवण्याच्या उद्देशानेच जातनिहाय गणना केली जात आहे. याचिकाकर्त्यांनी बिहार सरकारच्या या धोरणात्मक निर्णयाला विरोध केला. जातनिहाय गणना केल्याने नेमका काय व कोणाला फायदा होणार आहे, असा सवाल याचिकाकर्त्यांचे वकील दिनू कुमार यांनी केला.'



नागरिकांची माहिती गोळा करण्याचा अधिकार राज्य शासनाला आहे. राज्य घटनेत तशी तरतूद करण्यात आली आहे. राज्य घटनेचा अनुच्छेद ३७ अंतर्गत प्रत्येक राज्य शासनाला हा अधिकार देण्यात आला आहे. त्याचाच आधार घेत बिहार सरकार जातनिहाय गणना करत आहे. जेणेकरुन बिहारमधील प्रत्येक घटकापर्यंत सरकारी योजनांचा लाभ पोहोचवता येईल, असे महाधिवक्ता शाही यांनी न्यायालयाला सांगितले. त्यावरही याचिकाकर्त्यांनी आक्षेप घेतला. जातीच्या माहितीसाठी याआधी मुंगेरीलाल आयोगाची स्थापना करण्यात आली होती. त्यामुळे आता बिहार सरकारने सुरु केलेली गणना बेकायदा आहे, असा दावा याचिकाकर्त्यांनी केला. मात्र सरकारकडे वंचित आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम नसलेल्या घटकांची माहिती नाही. परिणामी ही गणना बिहार सरकारने सुरु केली आहे. ही केवळ जातनिहाय गणना नाही. ही जातनिहाय गणना व आर्थिक सर्व्हेक्षण आहे, असा युक्तिवाद महाधिवक्ता शाही यांनी केला. असे असले तरी जातनिहाय गणना करण्याचा तुमचा हेतू हा राजकीय हेतूने प्रेरित आहे. हे सर्व राजकीय स्वार्थासाठीच सुरु आहे, असा आरोप याचिकाकर्त्यांनी केला. त्यावर महाधिवक्ता शाही म्हणाले, 'राज्य सरकार असो की केंद्र सरकार. प्रत्येक धोरणात्मक निर्णय हा व्होटबँकसाठी घेतलेला असतो. मतदाराला सोयी सुविधा देण्यासाठीच सरकार निर्णय घेत असते. उभंयतांचा युक्तिवाद पूर्ण झाल्यानंतर न्यायालयाने यावरील निर्णय राखून ठेवला होता. गुरुवारी अंतरिम आदेश देताना न्यायालयाने बिहार सरकारला झटका देत जातनिहाय जणनाच थांबवली. यावरील पुढील सुनावणी जुलै महिन्यात होणार आहे.'

# मंगळवेढ्यासाठी ज्वारी क्लस्टर व टेक्निकल सेंटर मंजूर करणार : राणे

## मंगळवेढा येथील कृषी उद्योजकता मेळाव्यात दिले आश्वासन

सुराज्य/मंगळवेढा

मंगळवेढा तालुक्यातील शेतकरी उत्पादकांना चांगला बाजार भाव मिळावा व बेरोजगारांना रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी यासाठी ज्वारी प्रक्रिया क्लस्टर मंजूर केले जाईल तसेच उद्योग व्यवसायात आधुनिकता यावी यासाठी टेक्निकल सेंटर मंजूर केले जाईल असे आश्वासन केंद्रीय सूक्ष्म लघु मंत्री नारायण राणे यांनी मंगळवेढा येथे दिले.

मंगळवेढा तालुक्यात अन्न प्रक्रिया उद्योग निर्मितीसाठी चालना मिळावी म्हणून शिक्षण प्रसारक मंडळ, इंग्लिश स्कूल येथे केंद्रीय सूक्ष्म लघु मध्यम उद्योगमंत्री नारायण राणे यांच्या उपस्थितीत कृषी उद्योजकता मेळावा संपन्न झाला. त्यावेळी ना. राणे बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रा. शिवाजीराव सावंत होते यावेळी व्यासपीठावर संस्थेचे अध्यक्ष ड सुजित कदम,सचिव प्रियदर्शिनी कदम महाडिक,माजी अध्यक्ष डॉ सुभाष कदम,डॉ मीनाक्षी कदम, तेजस्विनी कदम,प्र. कुलगुरू डॉ. राजेश गादेवार,माजी मंत्री प्रा लक्ष्मणराव ढोबळे, भीमाचे कारखान्याचे चेअरमन विश्वराज महाडिक धनश्री परिवाराचे प्रा शिवाजीराव काळुंगे माजी सभापती सोमनाथ आवताडे प्रणव परिचारक, शशिकांत चव्हाण



आदी उपस्थित होते.

राणे पुढे म्हणाले, मंगळवेढा सारख्या दुष्काळी भागात उद्योजक निर्माण व्हावेत या भागातील बेरोजगार युवक महिला यांचे आर्थिक उत्पन्न वाढावे रोजगारनिर्मिती व्हावी, आर्थिक सुबत्तेत वाढ व्हावी यासाठी प्रियदर्शनी कदम महाडिक यांनी घेतलेला पुढाकार कौतुकास्पद आहे. या भागात ४४ उसाचे कारखाने असून देखील केवळ साखर हे उत्पादन केल्यामुळे शेतकऱ्यांना म्हणावा असा भाव मिळत नाही. त्यामुळे कारखानदारानी इतर प्रक्रिया उद्योग राबवून शेतकऱ्यांना जास्त भाव कसा मिळेल याकडे पाहिले पाहिजे.


आपल्या भागात अनेक पिकांचे उत्पादन चांगल्या पद्धतीने होत असले तरी त्याचे मार्केटिंग व्यवस्थित रित्या होत नाही. यावेळी प्रास्ताविकात प्रियदर्शनी कदम यांनी मंगळवेढ्यात कृषी उद्योजकता मेळावा घेण्यामागची भूमिका स्पष्ट करीत या भागातील उद्योजकांना केंद्र सरकारने मदत करावी व या भागासाठी क्लस्टर देण्याची मागणी यावेळी केली.

### उद्योजक बनण्यासाठी अर्जासह हाक द्या मी मदत करेन

मी जनतेचा सेवक असून मंगळवेढा परिसरातील बेरोजगारी कमी करून उद्योजक निर्माण करण्यासाठी तुम्ही अर्जासह हाक द्या, मी मदत करण्यास तयार आहे.ज्वारी,बाजरी, डाळिंब, संत्रा, अननस,ज्यूस जागतिक बाजारात चांगली किंमत आहे, तरूणांनी आत्मनिर्भर होण्यासाठी प्रयत्न करावेत.मंगळवेढ्यात उद्योजक निर्माण होण्यासाठी क्लस्टर मंजूर करेन, त्यासाठीची कागदपत्रे पुर्तता करावी, महिलांसाठी अनेक उद्योग आहेत.त्यासाठी कर्ज व सबसिडी आहे.आधुनिक प्रगतीचे मार्ग कोणते,जगात वापरले जाणारे तंत्रज्ञान याची माहिती व प्रशिक्षण देण्याची तयारी असल्याची ग्वाही नारायण राणे यांनी दिली.

## अपघातामधील जखमीचा मृत्यू

सोलापूर : मोडनिंब ते मानेगाव या रस्त्यावर चार चाकी वाहनाच्या धडकेने जखमी झालेले गौरीशंकर रामलिंग कानडे (वय ५० रा. मानेगाव ता.बार्शी) हे सोलापुरातील शासकीय रुग्णालयात उपचार घेताना गुरुवारी सकाळी मयत झाले. ते २५ मे रोजी सायंकाळी मोडनिंब ते मानेगाव असे पायी निघाले होते. त्यावेळी हा अपघात घडला होता. त्यांना वैराग त्यानंतर सोलापुरातील खाजगी रुग्णालयात उपचार करून २ मे रोजी शासकीय रुग्णालयात दाखल केले होते. अशी नोंद तालुका पोलिसात झाली आहे.



श्री नृसिंह जयंतीनिमित्त सोलापूरच्या दत्त चौकातील जुने दत्त मंदिरात गुरुवारी मोगरा उत्सवाची सजावट करण्यात आली होती.

### पवार दोन दिवस सोलापूर दौऱ्यावर

## शहर-जिल्ह्यात चांगलीच राजकीय खलबते होणार

सुराज्य/सोलापूर



नुकतेच राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्ष पदावरून पायउतार होण्याचा निर्णय घेतलेले ज्येष्ठ नेते शरद पवार हे दोन दिवसाच्या सोलापूर दौऱ्यावर येत आहेत. त्यांच्या या दौऱ्यामुळे सोलापूर जिल्ह्यात चांगलीच राजकीय खलबते होण्याची शक्यता आहे.

रविवार ७ आणि सोमवार ८ मे रोजी ते सोलापूर शहर आणि जिल्ह्याच्या दौऱ्यावर असणार आहेत. रविवारी सकाळी साडेदहा वाजता हेलिकॉप्टर नेते विठ्ठल सहकारी साखर कारखाना वेणूनगर (पंढरपूर) या ठिकाणी त्यांचे आगमन होईल. सायंकाळी पाच वाजता मोटारने ते सांगोला येथील मेडशिंगी या ठिकाणी जातील. त्या ठिकाणी एका कार्यक्रमाला उपस्थिती लावून रात्री साडेआठ वाजता शरदचंद्र पवार प्रशालेच्या ठिकाणी मनोहर सपाटे यांच्या कुटुंबातील विवाह सोहळ्याला ते उपस्थित राहणार आहेत.

रविवारी शासकीय विश्रामगृह सोलापूर या ठिकाणी त्यांचा मुक्काम राहणार आहे. सोमवारी सकाळी साडेनऊ वाजता सोलापूर विमानतळावरून हेलिकॉप्टरने ते पुन्हा सांगोला येथे जातील. त्या ठिकाणी बाबुराव गायकवाड यांच्या अमृत महोत्सवी सत्कार समारंभाला उपस्थित राहणार असून तिथून पुढे ते हेलिकॉप्टरने साताऱ्याकडे प्रयाण करतील.

### नाना पटोलेही रविवारी जिल्ह्यात



काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोलेही रविवारी सोलापूर जिल्ह्यात येणार आहेत. सिद्धेश्वर एक्स्प्रेसने पहाटे पाच वाजता ते कुर्डूवाडीत येणार आहेत. सकाळी १० माढा तालुका काँग्रेसच्यावतीने आयोजित मेळाव्याला ते उपस्थित राहणार आहेत. दुपारी अडीच वाजता महुद येथील महिला कामगारांच्या मेळाव्याला उपस्थिती, ५ वाजता सांगोला येथे आ. रविंद्र धंगेकर यांच्या सत्कार कार्यक्रमाला उपस्थिती, ७ वाजता सांगोल्यातील मुस्लिम समाजाच्या मेळाव्याला उपस्थिती, रात्री पंढरपूर येथे मुक्काम. सोमवार ८ रोजी जिल्हा काँग्रेसच्यावतीने आयोजित कार्यक्रमाला उपस्थिती. त्यानंतर साताऱ्याकडे प्रयाय असा त्यांचा कार्यक्रम आहे.

## विविध ठिकाणांहून दुचाकी पळवल्या

सोलापूर : शहरातील विविध ठिकाणी लावलेल्या तीन दुचाकी चोरीला गेल्या. यात पासपोर्ट ऑफीसच्या बाजूला लावण्यात आलेली दुचाकी चोरीला गेल्याप्रकरणी सिध्देश्वर ढब्बे (वय-३१,रा.मजरेवाडी,होटगी रोड) यांनी फौजदार चावडी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

या फिर्यादीवरून अज्ञात चोरावर गुन्हा दाखल झाला आहे. दुसऱ्या घटनेत जिल्हा व सत्र न्यायालय येथील वकिल ऑफिसच्या दगडी बिल्डींग जवळ लावण्यात आलेली दुचाकी अज्ञाताने चोरली.

याबाबत संतोष रेवणसिध्द बागले (वय-४२,रा.उमा नगरी, मुरारजी पेठ) यांनी जेलरोड पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तिसऱ्या घटनेत कुमठा नाका परिसरातील कुर्बान हुसेन नगर येथे लावलेली दुचाकी अज्ञाताने चोरली.

याबाबत युन्नुस शुकुर शेख (वय-२४, रा.गैबीपीर नगर, झोपडपट्टी) यांनी सदर बाझार पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.याबाबत अज्ञात चोरावर गुन्हा दाखल झाला आहे.घटनेचा तपास पोलिस करत आहेत.

## राहुल गांधी झोपडपट्टीत दगडफेक

सोलापूर :जेलरोड परिसरातील राहुलगांधी झोपडपट्टी येथे झालेल्या दगडफेकीत एका महिलेसह दोघेजण जखमी झाले . ही घटना बुधवारी रात्री ११ वाजेच्या सुमारास घडली.

शबाना अनवर शेख (वय ३०) आणि अल्लाबक्ष दाऊद चौधरी (वय ३८ दोघे रा. राहुल गांधी झोपडपट्टी) अशी जखमींची नावे आहेत. त्यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. काल रात्री ११ वाजेच्या सुमारास शबाना शेख यांच्या घरासमोर काहीजण भांडण करीत होते. त्यावेळी त्यांनी घराजवळ गोंधळ करू नका असे सांगितले. त्यावेळी शोएब पटेल, शाहरुख पटेल आणि अन्य चौघाजणांनी दगडफेक केली. त्यात दोघेजण जखमी झाले. या घटनेची नोंद जेल रोड पोलिसात झाली आहे.

## इंद्रभुवनसह पाच इमारतींच्या साफसफाईचे टेंडर निघाले

सुराज्य/सोलापूर

सोलापूर महापालिकेच्या विविध कार्यालय व इमारतींमध्ये पान तंबाखू गुटखा खाऊन थुंकण्यासह अस्वच्छतेचे विदारक चित्र दिसून येते. यामुळे महापालिकेच्या इमारती स्वच्छ व नेटक्या राहण्यासाठी अखेर इंद्रभुवन, कौन्सिल हॉल, महापालिका प्रशासकीय इमारतसह ५ इमारतींच्या साफसफाईच्या कामाचा मक्ता काढण्यात आल्याची माहिती महापालिका आयुक्त शितल तेली - उगले यांनी घेतला आहे.

वास्तविक पाहता स्वच्छतेचा संदेश देणाऱ्या महापालिकेची कार्यालये स्वच्छ व नेटकी असणे आवश्यक आहे मात्र तसे दिसत नाही. पान, तंबाखू, गुटखा खाऊन थुंकल्याने महापालिका आवारातील प्रशासकीय इमारत व इतर कार्यालयांमध्येही अस्वच्छतेचे विदारक दर्शन घडते. स्वच्छ सोलापूर - सुंदर सोलापूर हे ब्रीद घेऊन काम करणाऱ्या सोलापूर महापालिकेच्या प्रशासकीय इमारत व इतर कार्यालयांमध्ये अस्वच्छतेचे दर्शन घडते. यामुळे महापालिकेच्या या इमारती स्वच्छ सुंदर व नेटक्या दिसाव्यात या उद्देशातून साफसफाईचा मक्ता व्यावसायिक कंपनीला देण्याचा निर्णय महापालिका आयुक्त शितल तेली - उगले यांनी घेतला असून टेंडर काढण्यात आल्याचेही सांगण्यात आले.

या ५ इमारतींची साफसफाई होणार महापालिका आवारातील इंद्रभुवन, कौन्सिल हॉल, प्रशासकीय इमारत तसेच हुतात्मा स्मृती मंदिर, डफरीन चौक येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर प्रस्तुतिगृह या ५ इमारतींच्या साफसफाईचा मक्ता देण्यात येणार आहे. साफसफाईची कामे करणाऱ्या व्यावसायिक संस्थेला ३ वर्षासाठी हा मक्ता देण्यात येणार आहे.

## पीएम किसान खात्याची ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करा

### अन्यथा अपात्र करण्याचा जिल्हा प्रशासनाचा इशारा

सुराज्य/सोलापूर

जिल्ह्यातील एकूण १ लाख ९२ हजार शेतकरी लाभार्थींची बँक खाती त्यांच्या आधार क्रमांशी जोडलेली नाहीत. तर १ लाख ४१ हजार ३७० लाभार्थींनी पीएम किसान खात्याची ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण केली नाही. त्यामुळे या लाभार्थींना १४ व्या हप्त्याचा लाभ जमा होणार नाही. तसेच, जे लाभार्थी वारंवार संपर्क करुनही ई-केवासी पूर्ण करीत नाहीत लाभार्थीस अपात्र मार्क करण्याचा इशारा जिल्हाप्रशासनाच्या वतीने दिला आहे.

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेअंतर्गत पात्र शेतकरी कुटुंबास २००० रुपये प्रति हप्ता या प्रमाणे ६००० रुपये प्रति वर्षी लाभ देण्यात येतो. योजनेच्या १४ व्या हप्त्याचा लाभ मे अथवा जून २०२३ मध्ये जमा होणार आहे. हप्त्याच्या लाभासाठी बँक खाते आधारशी जोडणे बंधनकारक आहे. लाभार्थीना त्यांचे बँक खाते

> पी.एम. किसान योजनेतील प्रलंबित लाभार्थींची बँक खाते आयपीपीबी मध्ये उघडून ती आधार क्रमांक जोडण्यासाठी प्रत्येक तालुक्यात व जिल्ह्याच्या पोस्ट कार्यालयास गावनिहाय याद्या उपलब्ध करून दिल्या आहेत. आयपीपीबीमार्फत १५ मे २०२३ पर्यंत गावपातळीवर सर्वत्र मोहीम राबवण्यात येत आहे. तरी बँक खाते उघडून योजनेचा लाभ घ्यावा,
>
> **-शमा पवार (निवासी उपजिल्हाधिकारी)**





आधार क्रमांकाशी जोडण्याची सुविधा गावातील पोस्ट कार्यालयात उपलब्ध करुन देण्यात आली आहे .या मोहिमेचा लाभ घ्यावा अशी माहिती निवासी उपजिल्हाधिकारी शमा पवार यांनी दिली.

लाभार्थीना त्यांचे बँक खाते आधार क्रमांकाची जोडण्याची सुविधा त्यांच्याच गावातील पोस्ट ऑफिस मार्फत उपलब्ध करण्यात आली आहे. यासाठी आधार कार्ड, मोबाईल क्रमांक या कागदपत्राद्वारे इंडिया पोस्ट पेमेंट बँकेत आपल्या गावातील पोस्ट कर्मचाऱ्यांमार्फत खाते उघडावे. सदरचे बँक खाते आपल्या आधार क्रमांकाची ४८ तासात जोडले जाईल. ही पध्दत अतिरीक्त कागदपत्राशिवाय करता येणार असल्याने अत्यंत सोपी व सुलभ आहे. बँक खाते सुरू करण्याची सुविधा आपल्याच गावातील पोस्ट कार्यालयात उपलब्ध असल्याने लाभार्थीना इतरत्र जाण्याची गरज पडणार नाही.

## वंचित बहुजन आघाडीच्या शहराध्यक्षपदी गोणेवार



सोलापूर : वंचित बहुजन आघाडीच्या शहराध्यक्षपदी शहर मध्य विधानसभा मतदारसंघातील मोची समाजाचे नेते प्रशांत गोणेवार यांची निवड करण्यात आली आहे. महासचिवपदी विनोद इंगळे, अकील शाक्य यांची निवड करण्यात आली आहे. वंचित बहुजन आघाडीच्या शहराध्यक्षांनी एक वर्षापूर्वी राजीनामा दिला होता. एक वर्षापासून हे पद रिक्त होते. वंचित बहुजन आघाडीच्या प्रदेशाध्यक्ष रेखा ठाकूर यांनी शहर कार्यकारिणीची नुकतीच घोषणा केली. शहर मध्य विधानसभा मतदारसंघातील मोची समाजाने काँग्रेसला मोठी साथ दिली आहे. वंचित बहुजन आघाडीने नवा शहराध्यक्ष मोची समाजात निवडला आहे. आगामी महापालिका आणि विधानसभा निवडणूक डोळ्यासमोर ठेवूनच ही निवड झाल्याचे वंचित बहुजन आघाडीच्या जिल्हा पदाधिकाऱ्यांनी सांगितले. महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पक्षाच्या कार्यकारिणीचा लवकरच विस्तार होणार आहे. यामध्ये प्रत्येक वॉर्डातील कार्यकर्त्यांचा समावेश होणार आहे.

**शहरातील पदाधिकारी पुढीलप्रमाणे - उपाध्यक्ष -राम रणसुरे, झाकीर शेख, रोहित लालसरे, इंद्रजीत कांबळे, श्रीनिवास संगेपांग, विजयानंद उघडे, संतोष बनसोडे.**

## प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यासाठी जि.प.मध्ये विशेष कॅम्पचे आयोजन

सुराज्य/सोलापूर

कर्मचारी आणि अधिकाऱ्यांना सेवानिवृत्तीनंतर निवृत्ती वेतनासाठी कार्यालयाच्या चकरा मारण्याची वेळ येऊ नये व उतार वयात मानसिक त्रास होऊ नये यासाठी अनेक उपक्रम घेण्यात आले आहेत व घेण्यात येत आहेत. तरीसुध्दा बरीचशी पेन्शन प्रकरणे प्रलंबित आहेत. त्यामुळे आता १२ आणि १३ मे रोजी प्रलंबित प्रकरणे करणे निकाली काढण्यासाठी विशेष कॅम्पचे आयोजन करण्यात आल्याची माहिती सीईओ दिलीप स्वामी यांनी दिली.

३ मे २०२३ रोजीच्या विभाग प्रमुखांच्या बैठकीत अनेक प्रकरणे प्रलंबित असल्याचे निदर्शनास आल्याने सर्व पेन्शन प्रकरणे तातडीने निकाली काढणेसाठी पेन्शन अदालत विशेष कॅम्पचे आयोजन करण्याबाबत





परिपत्रकाद्वारे सर्व विभागांना सुचित केले आहे. सर्व विभाग प्रमुख त्यांच्याकडील आस्थापना अधिकारी, कर्मचारी यांची बैठक घेऊन प्रलंबित प्रकरणांचा आढावा घेतील, पेन्शन प्रलंबित असलेल्या कर्मचारी यांची यादी तयार करून प्रलंबिततेचे कारणही नमूद करतील व त्याओनंतर प्रलंबित असल्याचा कारणावर उपाय शोधून त्यासाठी करावयाचे उपाययोजना तयार केल्या जातील.

लेखाधिकारी, सक्षम अधिकाऱ्यांनी या सर्व प्रकरणांचा अभ्यास करून विशेष कॅम्पचे नियोजनाची पूर्व तयारी करावी. त्रुटी असल्यास त्याच्या पूर्ततेबाबत संबंधित कर्मचारी यांना तसे लेखी पत्र देऊन पूर्ततेबाबत कळविणे, त्यासाठी १० मे. व ११ मे ३ राखीव ठेवावी पेन्शन अदालत प्रलंबित पेन्शन प्रकरणे निकाली काढण्यासाठी विशेष कॅम्पचे आयोजन, फलक इत्यादी व कैम्प कार्यक्रमाचे नियोजन सामान्य प्रशासन विभाग करणार आहे. प्रत्यक्ष अभियानास प्रारंभ दि. १२ व १३ मे, रोजी जिल्हा परिषदेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात होईल.

हे कॅम्प आयोजन, मार्गदर्शन व निकाली काढण्यासाठी मुख्य लेखा व वित्त अधिकारी हे मुबलक लेखाधिकारी, कर्मचारी यांची नियुक्ती करतील, संपूर्ण प्रकरणे निकाली नाही निघाल्यास एक-दोन दिवस कालावधी वाढवून घेण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

## दहा महिन्यांपासून टॉय ट्रेन बंद; बच्चे कंपनीत नाराजी

सुराज्य/सोलापूर

अबालवृद्धांच्या करमणुकीसाठी महापालिकेने मोठा गाजावाजा करत सिद्धेश्वर मंदिर परिसरात टॉय ट्रेन सुरू केली. परंतु, गेल्या दहा महिन्यांपासून येथील टॉय ट्रेन बंद पडली आहे. दुसरीकडे प्राणी संग्रहालयही बंद असल्याने बच्चे कंपनीसाठी कोणतेही मनोरंजनाचे साधान उपलब्ध नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे बच्चे कंपनीत नाराजी व्यक्त होत आहे.

स्मार्ट सिटीअंतर्गत डव्हेंचर पार्क, स्ट्रीट बाजार, होम मैदान तसेच सिद्धेश्वर मंदिर परिसरात वॉकिंग ट्रॅक व बाग विकसित करण्यात आली आहे. या तलाव परिसराची शोभा आणखीन वाढविण्यासाठी तसेच आबालवृद्धांच्या मनोरंजनासाठी टॉय ट्रेनची सुरवात करण्यात आली. सिद्धेश्वर तलाव





परिसरात एप्रिल २०२३ मध्ये रोजी मोठ्या थाटामाटात टॉय ट्रेनची सफर सोलापूरकरांच्या सेवेत दाखल झाली. मोठ्या व्यक्तींसाठी २० तर लहान मुलांसाठी १० रुपये तिकीट दर आकारण्यात आले. या टॉय ट्रेनच्या सफरीसाठी सकाळी चार व सायंकाळी चार अशी आठ तासांची वेळ देण्यात आली होती.

प्रथमच दाखल झालेल्या टॉय ट्रेनची उत्सुकता मुलांना लागून राहिली होती. मात्र केवळ काही महिनेच महापालिकेच्या वतीने ही टॉय ट्रेन चालविण्यात आली. ५४ हजारांचे मासिक उत्पन्न यातून महापालिकेला मिळाले. दरम्यान, जून- जुलैच्या महिन्यात अचानक या परिसरातील टॉय ट्रेन बंद पडली. मंदिर परिसरात आठ महिन्यांपासून गाडी दुरुस्तीला गेल्याचे सांगण्यात आले. परंतु, ही टॉय ट्रेन किती कालावधीसाठी बंद राहणार आहे, याबाबत कोणतेही फलक लावलेले नाही. ट्रॉय ट्रेन तब्बल दहा महिन्यांपासून बंद असल्याने ती खराब होण्याची शक्यता वाढली आहे. त्यामुळे महापालिकेने तत्काळ ती सुरू करण्याची मागणी होत आहे. सध्या उन्हाळा सुटीचा कालवधी आहे. सर्व मुलांना शाळेला सुट्या लागल्या आहेत. त्यांच्या आवडीची ट्रॉय ट्रेन बंद पडल्याने मुलांमध्ये नाराजी पसरली आहे.

### मक्ता देऊनही ट्रेन सुरू नाही

महापालिका टॉय ट्रेन चालविण्यासाठी सक्षम नसल्याने एसपी टॉय झोन या संस्थेला खासगी तत्त्वावर चालविण्यासाठी देण्यात आली होती. या संस्थेने देखील मक्ता घेतला असला तरी तरी टॉय ट्रेन सुरू केली नाही, त्यामुळे बच्चे कंपनीत नाराजी पसरली आहे.

### टॉय ट्रेन लवकर सुरू करण्याचा प्रयत्न करू: आयुक्त

टॉय ट्रेन लहान मुलांसाठी चांगले आकर्षण होते. याबाबत चौकशी करून लवकरच ही ट्रेन सुरू करण्यासाठी प्रयत्न करू, असे महापालिका आयुक्त शितल तेली उगले यांनी सांगितले.

## विवाहितेचे १ लाख ६५ हजारांचे दागिने लंपास

सुराज्य/सोलापूर

भावाच्या लग्नासाठी पित्यासोबत माहेरी निघालेल्या विवाहितेचे १ लाख ६५ हजारांचे साडे तीन तोळे दागिने चोरट्यांनी एसटी बस प्रवासात लांबविल्याची घटना सोलापूर-बार्शी मार्गावर घडली. ही घटना १ मे रोजी सायंकाळी घडली. याबाबत वैराग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून गेल्या दोन महिन्यातील ही दुसरी घटना आहे. बार्शी तालुक्यात ढोराळे येथील शिवाजी पंढरी काकडे यांच्या मुलाचा विवाह ९ मे रोजी निश्चित करण्यात आला. त्यासाठी ते विवाहित मुलीला माहेरी आणण्यासाठी १ मे रोजी सोलापूरला तिच्या सासरी आले होते. सासरमधून मुलीला घेऊन आपल्या गावी परतले. घरी आल्यानंतर मुलीने स्वत:चे दागिने आईकडे देण्याकरिता बॅग पाहिली असता आत ठेवलेले साडेतीन तोळे सोने चोरट्यांनी लांबवल्याचे लक्षात आले. त्यानंतर त्यांनी वैराग पोलीस ठाणे गाठून फिर्याद दिली.

### सासऱ्यावर कोयत्याने वार

जावयाला मारहाण करताना सोडवण्यासाठी गेलेल्या सासऱ्यावर कोयत्याने वार करून जखमी केल्याप्रकरणी चौघांवर गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत अनिल कजाकवाले (वय-५३,रा. लोधी गल्ली) यांच्या फिर्यादीवरून राजेश रामू मदनावाले,किरण रामू मदनावाले,अजय संजय चौधरी, सोनू संजय चौधरी या चौघांवर सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.घटनेचा तपास कंचे करत आहेत.